दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३६ वा ▶ सोमवार दि.११ डिसेंबर २०२३ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे :६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### खिशातून लांबवली रोकड

**धुळे ।** शहरातील बाजार समितीच्या आवारात अर्जुन भिका जोगी ( वय ४२) यांना काळ्या रंगाच्या वाहनावरून आलेल्या दोघांनी धडक दिली. यात अर्जुन जोगी यांचा तोल गेला. ही संधी हेरून अज्ञात दोघांनी जोगी यांच्या खिशातील ५० हजारांची रोकड घेऊन गर्दीतून पळ काढला, अशी तक्रार अर्जुन जोगी यांनी दिली आहे. आझाद नगर पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस तपास करीत आहेत.

### मालगाडीचे सात डब्बे रुळांवरुन घसरले

**मुंबई ।** मध्य रेल्वेच्या इगतपुरी ते कसारा दरम्यान एका मालगाडीचे सात डब्बे रुळांवरुन घसरले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मुंबईतून बाहेर गावी जाणाऱ्या लांब पल्याच्या मेल-एक्सप्रेस गाड्यांचे वेळापत्रक मात्र कोलमडले आहे. या अपघातानंतर सीएसएमटी-हावडा एक्सप्रेस आणि सीएसएमटी- आदिलाबाद नंदीग्राम एक्सप्रेससह अनेक मेल-एक्सप्रेस गाड्या खोळंबल्या आहेत. रविवारी संध्याकाळी ६ वाजून ३१ मिनिटांच्या सुमारास इगतपुरी ते कसारा स्थानकांदरम्यान डाऊन मार्गावर एक मालगाडीच्या अपघात घडला आहे.

# छगन भुजबळ यांनी माझा धसका घेतलाय : ते सध्या झोपेतही बरळतात : मनोज जरांगे

### आरक्षण मिळू द्या किती दम आहे ते नंतर बघणारच

**मुंबई । प्रतिनिधी**



### समाजात तेढ निर्माण करण्याचे काम

**मराठा आरक्षणाचे स्वप्न पूर्ण होऊ नये, मराठ्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही, असा त्यांचा डाव आहे. म्हणूनच गैरसमज पसरवून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम काही राजकीय मंडळी करीत असल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे नाव न घेता मनोज जरांगे यांनी केला आहे.**

माझी भाषा मराठवाड्याची आहे, त्यांना नाही समजणार. आरक्षण मिळू द्यायचा नाही हा त्यांचा डाव आहे. तुम्ही सध्या मंत्री आहात, संविधानाची शपथ घेतली आहे, मंत्री पदाचा गैरवापर करू नका, मी रोज काय बोलतो आज काय बोलला, आज काय बोलला याचा धसका घेतला असून सध्या ते झोपेतही बरळत आहे, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. तर आभाळ आले की त्याचे डोके फिरल्यावानी होते असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांना टोला लगावला आहे.

दरम्यान मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, मराठा समाजाच्या जनरेट्यापुढे सरकारने पूर्ण हात टेकले आहेत. स्वातंत्र्याच्या अगोदरच आरक्षण होते सत्तर वर्ष का? दिले नाही.आरक्षण मिळावे, यासाठी मराठा समाजाची झालेली एकजुट काही लोकांच्या मनात खुपत आहे. मराठा आरक्षणाचे स्वप्न पूर्ण होऊ नये, त्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही, असा त्यांचा डाव आहे. त्यासाठी गैरसमज पसरवून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम काही राजकीय मंडळी करीत असल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे नाव न घेता केला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की,देवेंद्र फडणवीसांनी सांगितले असेल की बोल म्हणून. कारण, लोंडा की फोंडा कोण आहे तो वळवळ करत आहे. हे फडणवीसांनीच सुरू करायला लावले आहे. देवेंद्र फडणवीस मराठ्यांच्या अंगावर किती मराठे घालणार आहे बघुयात, मराठा बघतोय. तुमच्या डोक्यात काही विषारी विचार असेल तर मराठा नेत्यांच्या डोक्यात नका ओतू. त्यांच्या माध्यमातून मराठ्यांत कलह लावू नका, असा इशाराही मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे. जर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी समाजाशी दगाफटका करून वेळ मारली तर पुढची वेळ तुम्हाला जड जाईल, आरक्षण मिळावे म्हणून सर्व समाज पाठीशी आहे.एकवेळ आरक्षण मिळू द्या किती दम आहे ते बघतोच असा इशारा त्यांनी दिला आहे.

# राष्ट्रवादी अजित पवार गट व भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये वाद



### रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावरील नावावरून महापौर संतापल्या

**धुळे । प्रतिनिधी**

धुळ्यात महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावर सांगितल्यानुसार नाव घेण्यात आले नाही. फलकावरील नावावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व सत्ताधारी भाजपच्या महापौर व नगरसेवकांमध्ये वाद झाल्याचे बघावयास मिळाले आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक कैलास चौधरी यांनी सुचवलेल्या महापालिका रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी फलकावर नाव नसल्याने त्यांनी सत्ताधारी असलेल्या भाजपच्या महापौर प्रतिभा चौधरी यांना जाब विचारला. उद्घाटन फलकावर त्यांचं नाव नसल्यावरून सत्ताधाऱ्यांमध्ये वाद झाल्याचे बघायला मिळाले आहे. कार्यक्रमाचा केला निषेध माजी नगरसेवक कैलास चौधरी यांना या कार्यक्रमातून डावलण्यात आल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या कार्यक्रमाचे निमंत्रण देखील त्यांना देण्यात आले नसल्यामुळे या कार्यक्रमाचा निषेध केला आहे.

## सोलापुरात राऊतांच्या कारवर चप्पलफेक




**सोलापूर ।** सोलापूरात एका हॉटेलच्या उद्घाटनासाठी गेलेले ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांच्या गाडीवर चप्पलफेक करण्यात आली. त्यानंतर घटनास्थळावर चांगलाच गोंधळ उडाला. तर अज्ञातांकडून ही चप्पलफेक केल्यानंतर 'नारायण राणे जिंदाबाद' अशा घोषणा देत घटनास्थळावरुन पळ काढला. संजय राऊत हे आज सोलापूर दौऱ्यावर आहेत. आज दिवसभर त्यांनी सोलापुरात विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. शिवसैनिकांशी संवाद साधला. मीडियाशीही संवाद साधला. संध्याकाळी त्यांचा मुख्य आणि महत्त्वाचा कार्यक्रम होता. राऊत यांच्या हस्ते हॉटेलचं उद्घाटन करण्यात येणार होतं. त्यामुळे राऊत थांबले होते. संध्याकाळी ते कार्यक्रम स्थळी आले. राऊत यांच्या हस्ते हॉटेलचं उद्घाटनही करण्यात आलं. त्यानंतर राऊत यांचे भाषणही झाले.

# धावत्या शिवशाही बसला भीषण आग

### सर्व प्रवाशी सुखरूप; अनर्थ टळला

**नाशिक । प्रतिनिधी**



निफाड तालुक्यातील चांदोरी नजीक असणाऱ्या शिंपी टाकळी फाटा येथे नाशिक ते छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर आज (दि.१०) रोजी दुपारच्या सुमारास धावत्या शिवशाही बसला भीषण आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नसून सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवशाही बस क्रमांक (एम.एच ०९, एफ एल ०४७७) ही बस नाशिकहून छत्रपती संभाजी नगरकडे जात होती. यावेळी बसमध्ये इंजिनच्या बाजूने दूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्यावेळी चालकाने तात्काळ बस थांबून सतर्कतेने बसमधील २० हून अधिक प्रवाशांना सुखरूप खाली उतरवले. त्यानंतर काही क्षणातच बसने मोठ्या स्वरूपात पेट घेतला. दरम्यान, या घटनेमुळे नाशिक ते छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर काहीकाळ वाहतूक ठप्प झाली होती. तसेच सदर आगीत संपूर्ण बस भक्षस्थानी पडली होती. यानंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

# चिमठाणे धुळे महामार्गावर अपघात

**चिमठाणे ।** धुळे व नंदुरबार महामार्गावर शहादा कडुन नाशिक कडे जाताना बाबूने भरलेली पिकअप व बसमध्ये अपघात घडला. त्यात बस मध्ये ५२ ते ५५ प्रवासी बसलेले असतांना हा अपघात झाला.सविस्तर माहिती अशी की एम एच .१८ .अ .अ.२८७३ चालक निलेश भटू पाटील रा फागणे यांची पिकअप वाहन धुळे कडुन दोंडाईचा कडे जात होते. त्यात टोकदार बांबूच्या गाडीचा ओव्हर लोड असल्याने पिकअप गाडी स्पिडने असल्याने पिक अप गाडी ने बसला कट मारल्या मुळे बसच्या आजूबाजूच्या काचेच्या खिडक्या फुटल्या व अनेक ठिकाणी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शहादा आगार बसच्या वाहक चालक यांनी प्रवासीना सुखरूप बाहेर काढून दुसऱ्या बसने रवाना केले.

# चांदवडच्या आंदोलनात शरद पवार उतरणार

**नाशिक । प्रतिनिधी**



केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. कांद्याचे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारनं निर्यात बंदी करण्याचा निर्णय घेतलाय. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी राहणार असल्याचे परिपत्रक सरकारकडून काढण्यात आलं आहे. मात्र, या निर्णयाच्या विरोधात राज्यातील वातावरण चांगलच तापलं आहे. ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलनं सुरु केली आहेत. अशातच आता कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार मैदानात उतरले आहेत. कांदा निर्यातबंदीच्या विरोधात येत्या सोमवारी ११ डिसेंबरला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्र्नांवर नाशिक जिल्ह्यातील चांदवडलाआंदोलन होणार आहे. या आंदोलनाला खुद्द शरद पवार उपस्थित राहणार आहेत. कांदा निर्यातबंदीवर केंद्र सरकारला जाग आणण्यासाठी खासदार शरद पवार हे आता मैदानात उतरले आहेत. ११ डिसेंबरला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्र्नांवर चांदवडला शेतकऱ्यांचा एल्गार होणार आहे. मुंबई-आग्रा रोड चांदवड चौफुली येथे हे शेतकरी आंदोलन होणार आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्र्नांवर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार स्वतः आंदोलनात सहभागी होणार आहेत. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना सहभागी होण्याचं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीनं करण्यात आलं आहे. दरम्यान, कांद्यावर निर्यातबंदी घातल्यानं शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे.केंद्र शासनाकडून ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. कांद्याच्या वाढत्या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र शासनाने निर्यात बंदीचा घेतला निर्णय घेतला आहे.

# भारत आदिवासी पार्टीची पक्ष मजबूतीकरण बैठक



**धुळे । प्रतिनिधी**

भारत आदिवासी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जितेंद्र असलकर हे रविवार दिनांक १० डिसेंबर रोजी धुळे जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली गुलमोहर शासकीय विश्रामगृह येथे पक्ष मजबुतीकरण बैठक घेण्यात आली.

मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीतही एक आमदार निवडून आणत पार्टीने आपले खाते उघडले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीतही महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये भारत आदिवासी पार्टीतर्फे उमेदवार दिले जातील. त्या अनुषंगानेच पक्ष मजबुतीकरणासाठी ठिकठिकाणी बैठकांचे आयोजन केले जात असल्याची माहितीही असलकर यांनी बैठकीत दिली. या बैठकीला भारत आदिवासी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आबा अहिरे, आदिवासी एकता परिषदेचे सचिव सुनील गायकवाड, आदिवासी टायगर सेनेचे पंढरीनाथ मोरे, जिल्हाध्यक्ष वल्लभ मालचे, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र माळी, दिनेश पिपळसे, किशोर ठाकरे, प्रवीण मोरे, तसेच अनेक आदिवासी संघटनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून आपली मते मांडली.

# थाळनेर येथे तलाठीवर हल्ला


**धुळे ।** शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथे तलाठी नवनीत खंडेराव पाटील (वय ३५) यांच्यावर सोनू आनंदसिंग जमादार तसेच अज्ञात एक व्यक्तीने दमदाटी करत हल्ला केला. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आला. थाळनेर पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला आहे.

# धुळे तालुक्यात ३० तलाठी व १० मंडळ कार्यालये मंजुर

### आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**धुळे । प्रतिनिधी**

### या गावांचा समावेश



**आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने मंजुर करण्यात आलेल्या तलाठी कार्यालय इमारत बांधकामासाठी. त्यात खेडे, वार, निमडाळे, अकलाड, पाडळदे, मेहरगाव, भदाणे, रामी,बोरीस, धनुर,बिलाडी,जापी, न्याहळोद, विश्वनाथ, वणी बु., आंबोडे, वेल्हाणे, जुनवणे,नंदाळे बु.,हेंद्रुण, तरवाडे, मोघण, पुरमेपाडा, धाडरे, रानमळा, धुळे शहर, महिंदळे, अवधान,रावेर, वरखेडे या गावांचा समावेश आहे. तसेच मंडळ कार्यालय इमारत बांधकामासाठी धुळे ग्रामीण, नेर,कुसूंबा, फागणे,धुळे शहर, सोनगीर, लामकानी, शिरुड, आर्वी,मुकटी या गावांचा समावेश आहे.**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने धुळे तालुक्यात ३० तलाठी कार्यालय इमारत आणि १० मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारत बांधकामांना मंजुरी मिळाली आहे. या कामासाठी एकूण ६ कोटी ७५ लक्ष रुपये मंजुर करण्यात आले असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले. मंडळ कार्यालय आणि तलाठी कार्यालय इमारतींच्या बांधकामांमुळे धुळे तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेची गैरसोय दूर होणार आहे.

तलाठी कार्यालय बांधकामासाठी ४ कोटी ७५ लक्ष रुपये तर मंडळ कार्यालयासाठी १ कोटी ८० लक्ष रुपये मंजुर करण्यात आले असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.

# बुधबाजारात व्यवसाय थाटल्यास साहित्य जप्त; बुधवारपासून कारवाई

**धुळे ।** शहरातील देवपूर बसस्थानकाजवळ बुधबाजार भरविला जातो. यामुळे रहदारीचा रस्ता बंद होऊन नागरिकांची गैरसोय होते. त्यामुळे येत्या बुधवारपासून तेथे कोणताही व्यवसाय करू नये अन्यथा संबंधित विक्रेत्यांच्या वस्तू, साहित्य महापालिका अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून जप्त केले जाईल, असा इशारा महापालिकेतर्फे देण्यात आला आहे. शहरातील देवपूर बसस्थानकाजवळ दर बुधवारी बाजार भरविला जातो. बुधबाजार या नावाने हा बाजार प्रसिद्ध आहे. या बुधबाजारात मोठ्या प्रमाणावर छोटे विक्रेते मोकळ्या जागेत तसेच रस्त्यावर दुकाने थाटतात. ग्राहकांचीही मोठी गर्दी या बाजारात खरेदीसाठी उसळते. त्यामुळे या भागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते.

# भ्रष्टाचारमुक्त भारताची ‘मोदी की गॅरंटी’- केशव उपाध्ये

**नाशिक । प्रतिनिधी**




झारखंडमधील काँग्रेस खासदाराकडील २०० कोटींचे घबाड हे तर काँग्रेसच्या भ्रष्टाचाराचे हिमनगाचे टोक आहे. भ्रष्टाचारमुक्त भारताची ‘मोदी की गॅरंटी’ असल्याचे प्रतिपादन भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटले. यावेळी प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदेश प्रवक्ते पंकज गांधी, नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, आ.सीमा हिरे, सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, उपस्थित होते.

भ्रष्टाचार, कमिशनखोरी, लुबाडणूक, दलाली आणि लाचखोरी याच इतिहासाने बरबरटेल्या काँग्रेसचा आणखी एक भ्रष्ट चेहरा झारखंडमध्ये उजेडात आला आहे. या राज्यात काँग्रेसचे राज्यसभा सदस्य धीरज साहू यांच्या घरात सुमारे नऊ कपाटांमध्ये खचाखच भरलेली दोनशे कोटींहून अधिक रकमेची रोकड जप्त करण्यात आली आहे. काळा पैसा आणि भ्रष्टाचार नष्ट करण्याच्या पंतप्रधान मोदी यांच्या मोहिमेतून आता काँग्रेसचा कारभार उघडकीस येऊ लागला असून जिथे काँग्रेस तिथे भ्रष्टाचार हे समीकरण झाले आहे. तर भ्रष्टाचार निपटून काढणे ही 'मोदी की गॅरंटी' असल्याचे स्पष्ट झाले आहे, असा घणाघाती दावा भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केला. भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. झारखंडमध्ये काँग्रेसच्या एका संसद सदस्याच्या घरात ही कोट्यवधींची रोकड सापडली, तर या हिशेबाने काँग्रेसच्या अन्य नेत्यांच्या घरी आणि काँग्रेसचे सर्वे सर्वा असलेल्या गांधी कुटुंबाकडे किती संपत्ती असेल? याचा हिशेब जनतेने करावा असेही ते म्हणाले. या हिशेबानुसार, गांधी परिवार हा जगातील सर्वात भ्रष्ट परिवार ठरेल, असा आरोपही त्यांनी केला.

# जनावरांच्या पोटात जात आहेत प्लास्टिक पिशव्या

### अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही

**दिवसभर खाल्लेला कचरा हळूहळू पोटात जमा होतो. हा कचरा पचत नाही. गायी, म्हशींत प्लास्टिक कचरा साठल्यामुळे दुधाचे प्रमाण कमी होते. एके दिवशी ही गाय तडफडून मरून जाते. न्यायालयाने याबाबत स्थानिक प्रशासनाला प्लास्टिक कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट करण्यासाठी आदेशही दिले आहेत; पण या आदेशाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. कचराकुंडीतील ९९ टक्के कचरा हा प्लास्टिकचाच असतो, हे वास्तव आहे.**



### प्लास्टिक कसे तयार होते?

**पॉलिथीनलिनपासून प्लास्टिक बॅगची निर्मिती होते. हे पॉलिइथिलिन नैसर्गिक वायूमधून खास प्रक्रिया करून मिळविले जाते. पॉलिमरमध्ये कार्बन आणि हायड्रोजनची प्रचंड मोठी शृंखला असते. उच्च घनता असलेले पॉलिइथिलिन, पॉलिव्हायनील क्लोराईड, कमी घनता असलेले पॉलिइथिलिन, पॉलिप्रॉपीलिन, पॉलिस्टायरिनही असते.**

कचराकुंड्यात आढळून येणारं खराब अन्न, प्लास्टिक पिशव्या आणि कचऱ्यामुळे जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. कचराकुंडीतील अन्न खाताना जनावरांच्या पोटात प्लास्टिक पिशव्या जात असून, तोंडात (जबड्यात) पत्र्याचे डब्बे अडकून राहत असल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागात सर्रास दिसून येते.

सध्या शहराचा विस्तार झपाट्याने वाढत असून, जागोजागी इमारती, घरे, बंगले, सोसायटी, नागरी वसाहती, टपऱ्या, दुकाने, हॉटेल वाढलेले आहे. या माध्यमातून कचरादेखील वाढलेला असून, हॉटेलचे खराब अन्न, भाजीपाला, कचरा, विनावापराच्या विविध वस्तू कचराकुंड्यासह कुठेही फेकून दिल्या जातात. काही मूळ मालकांनी त्यांची जनावरे मोकाट सोडलेली आहेत तसेच जनावरांच्या जीवावर काहीजण धंदा करीत असून, त्यांची अनेक जनावरे विविध रस्त्यांवर मोकाट फिरत असतात. त्यांचे जनावरांच्या खाण्या-पिण्याकडे लक्ष नसते. भूक लागल्यावर बहुतांश जनावरे थेट कचराकुंड्यावर दाखल होतात. येथील अन्न खाताना प्लास्टिक पिशव्या, दूध पावडरचे रिकामे पत्र्याचे डब्बे, तारा, वायर, काचा, खिळे, लोखंडी व प्लास्टिक तुकडे अशा विविध वस्तूंपासून जनावरांना धोका असतो. बऱ्याच जनावरांच्या पोटात प्लास्टिक व तोंडात पत्र्याचे डब्बे अडकून बसतात. याकडे कोणाचे लक्ष गेले तरच डब्बा अडकल्याचे लक्षात येते. अन्यथा जनावराला त्रास सहन करावा लागतो. गाय, बैलांच्या तोंडातून डब्बे काढणे मुश्कील काम असते. संबंधित जनावरांना बेशुद्ध करावे लागते. बऱ्याचदा या कामासाठी रेस्क्यू पथकाला बोलवावे लागते तसेच काही सामाजिक कार्यकर्ते व जनावरांचे डॉक्टर या कामासाठी नेहमी प्रयत्न करतात. याबाबत यश न आल्यास जनावरांचे जीव गेले आहेत.

ग्रामीण भाग असो, की शहरी भाग. अन्न शोधण्यासाठी गायी, म्हशी, अन्य पाळीव प्राणी रस्त्याने दिवसभर हिंडतात. रस्त्याच्या बाजूला वर्षानुवर्षे कचरा साठलेला असतो. हा कचरा वेळेवर हटविला जात नाही. या कचऱ्यात प्लास्टिकचे प्रमाण प्रचंड असते.

शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

## काँग्रेसला मिरची लागली

सारा गांधी-नेहरू परिवार काँग्रेसचे दैवत आहे. त्यांच्याविषयी काहीही वास्तव बोलले तरी काँग्रेसला ते सहन होत नाही. जणू काही आकाशातून पडलेली ही दैवते आहेत व त्यांनी केलेले सर्व काही शंभर टक्के योग्य होते अशी काँग्रेसजनांची समजूत आहे. अशा भ्रामक समजुतीत सतत वावरल्यामुळेच काँग्रेसची जनतेशी नाळ तुटली आहे व त्याचा फटका वेळोवेळी निवडणुकीत पक्षाला बसतो आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत जम्मू-काश्मीर सुधारणा विधेयक २०२३ मांडताना काश्मीर समस्या पं. नेहरूंमुळे निर्माण झाली, पंडित नेहरूंमुळेच पाकिस्तानव्याप्त काश्मीर निर्माण झाला असे वास्तव सांगितले. अमित शहा यांचे वक्तव्य ऐकून काँग्रेसचे खासदार भडकले, त्यांच्या दैवतावर सरकारने हल्ला केला म्हणून ते डिवचले गेले. पण पंडित नेहरूंनी केलेली चूक कधीच कोणी सांगायची नाही का?

देशाला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्षे झाली. स्वातंत्र्याचा अमृत काळ म्हणून सर्वत्र उल्लेख केला जात आहे. पण पाकिस्तानव्याप्त काश्मीर आजही भारताच्या बाहेर व पाकिस्तानच्या कब्जात आहे हे मोठे दुर्दैव आहे. पं. नेहरूंनी केलेल्या मोठ्या चुकीमुळे हे सारे घडले आहे, असे अमित शहा यांनी सांगितले, तर काँग्रेसच्या खासदारांनी थयथयाट कशाला करायचा? जे सत्य आहे ते देशाच्या संसदीय लोकशाहीच्या सर्वोच्च व्यासपीठावर अमित शहा यांनी सांगितले. देशावर काँग्रेसने सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली मग संयुक्त राष्ट्र संघात काश्मीर प्रश्न का सोडवता आला नाही? पाकिस्तानव्याप्त काश्मीरला भारतात का आणता आले नाही? पाकिस्तानव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे ही भारताची भूमिका सातत्याने राहिली आहे. जे काँग्रेसला जमले नाही ते भारतीय जनता पक्ष करून दाखविणार यावर जनतेचा विश्वास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच काश्मीरची समस्या सोडवतील असे प्रत्येक भारतीयाला वाटते आहे. जी चूक पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली ती दुरुस्त करण्याचे काम मोदी- शहा हेच करू शकतील, असा जनतेला विश्वास वाटतो.

अमित शहा यांनी संसदेत मांडलेले जम्मू-काश्मीर सुधारणा विधेयक २०२३ हे गेली सत्तर वर्षांपासून जे अपमानीत राहिले, अन्याय सहन करीत राहिले व दुर्लक्षित राहिले, त्यांना न्याय देणारे विधेयक आहे असे स्वत: केंद्रीय गृहमंत्र्यांनी विधेयक मांडताना सांगितले आहे. सुधारित विधेयकानुसार जम्मूमध्ये पूर्वी विधानसभेच्या ३७ जागा होत्या, त्या आता ४३ होतील, काश्मीरमध्ये विधानसभेच्या ४६ जागा होत्या त्या आता ४७ होतील. जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील २४ जागा राखीव आहेत कारण तो भारताचाच प्रदेश आहे, ही आपल्या देशाची भूमिका आहे. त्याशिवाय नामनियुक्त सदस्यांच्या संख्येतही वाढ करण्यात आली आहे, पूर्वी नामनियुक्तांची संख्या ४ होती आती ती ५ करण्यात आली आहे. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधूनही एक नामनियुक्त सदस्य विधानसभेवर घेण्याची तरतूद सुधारित विधेयकात आहे. जम्मू-काश्मीरला घटनेतील ३७० व ३५ (अ) कलमाचे सुरक्षा कवच गेल्या सत्तर वर्षांपासून होते. या राज्याला त्यामुळे विशेषाधिकार प्राप्त झाले होते. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने जम्मू-काश्मीर राज्याला विशेषाधिकार देणारे ३७० व ३५ (अ) कलम रद्द केले तेव्हा काँग्रेसने तसेच त्या राज्यातील फारूख अब्दुल्ला तसेच मेहबुबा सईद यांच्या पक्षाने तसेच देशातील भाजपा विरोधकांनी गळे काढले होते. दिवसाढवळ्या पंडितांच्या घरात घुसून दहशतवादी रक्तांचे सडे शिंपत होते. तेव्हा जे गप्प बसले होते ते आज अमित शहांच्या भाषणावर संताप प्रकट करताना दिसले. काँग्रेसच्या काळात काश्मीरमध्ये दहशतवाद फोफावला. त्या काळात चार लाख पंडितांना आपली घरे-दारे सोडून अंगावरच्या वस्त्रानिशी बायका-मुलांसह खोऱ्यातून पळ काढावा लागला होता. खोऱ्यातून तातडीने निघून जा, अशा धमक्या उघडपणे लाऊडस्पिकरवरून दिल्या जात होत्या. तेव्हा ३७० व्या कलमाचे प्रेमी कुठे लपून बसले होते? मोदी सरकारने ३७० वे कलम रद्द केल्यापासून दहशतवादाच्या घटनांमध्ये मोठी घट झाली आहे. एन्कौन्टरचे प्रमाणही घटले आहे. मोदी सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये साडेसात लाख रोजगार उपलब्ध करून दिले. तेथील विकासकामांनाही वेग आला आहे. पण नेहरूंमुळे काश्मीर समस्या निर्माण झाली हे सत्य सरकारने सांगताच काँग्रेसला मिरची लागली.

## तेलंगणा, छत्तीसगडमध्ये सत्तांतर का?

छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये अनेक कल्पक योजना राबवल्या गेल्या. तेथील प्रशासनही ठिकठाक भासत होते. तरीही जनतेने येथील राजवट उलथवून टाकली. मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील निकालांकडे अधिक लक्ष गेल्याने या राज्यांमधील लक्षवेधी राजकीय गणित फारसे पुढे आले नाही. मात्र या दोन राज्यांतील सत्ताधारी पक्ष पराभूत होण्यामागील काहीशी समान परिस्थिती भारतीय मतदारांच्या मनोभूमिकेवर भाष्य करणारी आहे. ताज्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला अन्य कोणतेही राज्य खात्रीशीरपणे मिळेल, असे वाटत नव्हते; परंतु छत्तीसगडमध्ये ७५ जागा मिळवून सत्तेवर येण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला होता.

विविध पाहण्यांमध्ये आणि मतदानोत्तर चाचण्यांमध्येही भाजपा कडवी लढत देईल; परंतु सत्ता काँग्रेसची येईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता; परंतु काँग्रेसचा पराभव झाला. परिस्थिती २००३ सारखी झाली. धर्मनिरपेक्षतेच्या मुद्द्यावर निवडून आलेल्या काँग्रेसने नंतर भाजपच्या वाटेने जाऊन आपली ओळख पुसली. मुळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाचा अजेंडा असलेला रामवन गमन मार्ग तयार करण्यात काँग्रेस सरकार व्यस्त राहिले. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी प्रभू रामाच्या आई कौसल्या यांच्या नावाने बांधलेल्या मंदिराचे सुशोभीकरण आणि प्रसिद्धी करण्याची एकही संधी सोडली नाही. ठिकठिकाणी प्रभू रामाच्या महाकाय पुतळ्यांची प्रतिष्ठापना ही सरकारची प्राथमिकता आहे, असे त्यांना वाटत



होते. एकीकडे काँग्रेसचे सरकार आदिवासींच्या श्रद्धेची प्रतीके हिंदू देवतांशी जोडत राहिले, तर दुसरीकडे आदिवासींच्या विरोधाला न जुमानता आंतरराष्ट्रीय रामायण महोत्सव, गावागावात मानस स्पर्धा असे कार्यक्रम राज्यभर सुरू राहिले.

भारताला हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी काँग्रेस नेत्यांच्या आश्रयाने आयोजित केलेल्या चर्चासत्रांची देशभर चर्चा झाली. त्याचप्रमाणे ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या आदिवासींवरील हल्ले, त्यांचे मृतदेह उकरून टाकणे आणि धार्मिक स्थळांची तोडफोड करणे या घटना काँग्रेस सरकारच्या काळात घडल्या. अशा अनेक घडामोडींमुळे हक्काचा मतदार काँग्रेसपासून दुरावला आणि ताजा निकाल समोर आला. तेलंगणामध्येही असेच काही घडले आणि भारत राष्ट्र समितीला पराभवाला सामोरे जावे लागले. उत्तराखंडमधील काँग्रेसचा पराभव बरेच काही सांगून जाणारा आहे. इथे जातीय दंगलीमध्ये मारल्या गेलेल्या हिंदूंच्या नातेवाइकांना नुकसानभरपाई आणि नोकऱ्या देण्यात आल्या. उलट, अशाच हिंसाचारात मारल्या गेलेल्या मुस्लिमांकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे चार टक्के अल्पसंख्याक समाज काँग्रेसवर नाराज झाला. हिंदुत्वाचे जे मैदान काँग्रेसने तयार केले, तेच मैदान भाजपाने काबीज करून विधानसभा निवडणुकीत विजय नोंदवला.

देशातील सर्वाधिक ३२०० रुपये प्रति क्विंटल दराने धान खरेदी, शेतकऱ्यांची कर्जमाफी, बचत गटांची कर्जमाफी, केजी ते पीजीपर्यंत मोफत शिक्षण अशा अनेक घोषणा या राज्यात काँग्रेसच्या भूपेश बघेल सरकारने केल्या. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने दारूबंदी, नक्षलवादावर शांततापूर्ण चर्चा, हसदेव येथील खाणी बंद करणे, बेरोजगार आणि महिलांना रोख रक्कम अशी आश्वासने दिली होती. त्यातील काहींची पूर्तता सरकारने केली नाही. कर्जमाफी आणि धान खरेदीमुळे सरकारची लोकप्रियता वाढली. याशिवाय २०० युनिटपर्यंतचे वीजबिल निम्मे करण्याचे आश्वासनही काँग्रेसने पूर्ण केले होते. अशा परिस्थितीत इतक्या फायद्याच्या योजना जाहीर करूनही जनतेने ताज्या निवडणुकीत काँग्रेसला का नाकारले, असा प्रश्न पडतो. काँग्रेसच्या अहंकार आणि फाजील आत्मविश्वासामुळे या पक्षाला जनतेने जागा दाखवून दिली. मधल्या काळात पक्ष आणि सरकार तसेच नेते आणि जनता यांच्यातली नाळ तुटली. भूपेश बघेल यांनी पाच वर्षे मुख्यमंत्री असताना पक्षात मोठ्या प्रमाणात गटबाजी केली. मंत्र्यांचे पंख छाटले. आमदारांची कामे झाली नाहीत. आमदारांच्या विरोधात नाराजी वाढली.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेसने २० आमदारांची तिकिटे कापली. दर चार-पाच महिन्यांनी आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. जणू काही बदली हाच इथला उद्योग आहे, असे चित्र होते. गेल्या पाच वर्षांमध्ये कोळसा घोटाळा, दारू घोटाळा, 'डीएमएफ' घोटाळा, 'ईडी' आणि प्राप्तिकर खात्याचे छापे, या आरोपांवरून मुख्यमंत्र्यांच्या जवळच्या अधिकाऱ्यांना तुरुंगात पाठवणे या मुद्द्यांचाही परिणाम झाला. बहुतांश सरकारी खात्यांमध्ये सर्रास भ्रष्टाचार घडत होता. काँग्रेसकडे बस्तर आणि सुरगुजामधील सर्व जागा होत्या; मात्र या पाच वर्षांमध्ये हसदेव ते सिल्गरपर्यंत दोन डझनहून अधिक ठिकाणी आदिवासींची आंदोलने सुरू राहिली आणि वर्षानुवर्षे सुरू असलेल्या या आंदोलनांकडे सरकारने दुर्लक्ष केलेच; पण काही भागांत या चळवळी दडपल्याही गेल्या. बस्तरमधील बनावट चकमकींच्या न्यायालयीन चौकशीवर कारवाई करण्याऐवजी सरकारने ती रोखून धरली. सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री वास्तवापासून दूर जाऊ लागले. सरकार आणि काँग्रेस पक्षाला जनआंदोलनांपासून दूर ठेवलेच; पण जनआंदोलनांतल्या नेत्यांच्या विरोधात अपमानास्पद वक्तव्य करण्याची एकही संधी मुख्यमंत्र्यांनी सोडली नाही. काँग्रेसचे तळागाळातील कार्यकर्तेही दुर्लक्षित झाले. याशिवाय पक्षातील गटबाजीवर नियंत्रण आणि मुख्यमंत्रीबदलाचा शब्द पाळण्यात काँग्रेस श्रेष्ठींना अपयश आले.

काहीसा असाच प्रकार तेलंगणामध्ये घडला. तिथे जनतेसाठी विविधांगी योजना राबवूनही के. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. 'आयडेंटिटी क्रायसीस' हा तिथला महत्त्वाचा मुद्दा ठरला. दक्षिणेकडील राज्यात प्रादेशिक अस्मिता कायम महत्त्वाची असते. 'तेलंगणा राष्ट्र समिती' हे राव यांच्या पक्षाचे नाव प्रादेशिक होते. ते बदलून 'भारत राष्ट्र समिती' करणे जनतेला फारसे रुचले नाही. नवीन पटनायक यांच्याप्रमाणे भाजपा आणि काँग्रेसला समान अंतरावर ठेवण्याचा राव यांचा आधी प्रयत्न होता. त्यांना तिसऱ्या आघाडीचे स्वप्न पडत होते. अखिलेश यादव, उद्धव ठाकरे, ममता बॅनर्जी आदी नेत्यांशी चर्चा करून देशाचे नेते बनण्याचे स्वप्न पाहताना त्यांना आपल्या पायाखालचे जाजम कुणी तरी काढून घेत आहे, याची जाणीवच झाली नाही. त्यातच पक्षवाढीसाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये शिरकाव केला. त्यासाठी बराच पैसा ओतला. तेलंगणामध्ये नाराजी वाढत असताना, मतदारांना हा कथित विस्तार पसंत नसताना राव मतदारांपासून दूर जात राहिले.

**क्रमशः**

## लोकरकाम हस्तकला व विणकाम व्यवसायाला सरकारी सहाकार्य अभावी घरघर

### आरोग्यदायी लोकरी वस्तु व्यवसाय लयास !

आजच्या मानवी युगात मानवाला अनेको शारीरिक व्याधींसोबत जगावे लागत आहे. अनेको आजार शरीराला त्रासदायक ठरणारे निर्माण झालेले आहेत.. अगदी कमी वयातच लोकांना सांधेदुखी, अंगदुखी, स्नायुंची व्याधी जडलेली आहे. त्यासाठी अनेक लोक रुग्णालये किंवा इतर घातक औषधांचा वापर करुन स्वत:चा पैसा आणि आरोग्य धोक्यात घालत आहेत. परंतु मेंढीच्या लोकरीपासुन तयार झालेली कांबडे(घोंगडी), जीन, लोकरीगादी, लोकरी आसनपट्टी हे अतिशय आरोग्यदायी आहेत. घोंगडीने थंडीपासुन बचाव तर होतोच परंतु माणसाला झालेले पित्त या व्याधीला दुर करण्यासाठी त्वचारोग दुर करण्यासाठी, खाज व्याधी संपविण्यासाठी लोकरी घोंगडी अतिशय उपयुक्त आहे. लोकरी जीन ८ रुंद आकाराची गादी सांस्कृतिक पुजेला घोंगडी गरजेची हे संधीवात आणि हाडांच्या दुखण्यावर अतिशय उपयोगी ठरतात. स्नायुंचे दुखणे,



संधीवात ज्या माणसाला असेल त्याच्यासाठी जीनवर झोपणे अतिशय उपयोगी आहे. लोकरी गादी ही सुद्धा माणसाचा चांगला रक्तपुरवठा, त्वचेचे आजार, हृदयरोग, स्नायुदुखी इ. व्याधींवर उपयोगी ठरते. लोकरी आसनपट्टी ही योगासने अथवा नेहमी बसण्यासाठी आरोग्यदायी ठरते. परंतु आज लोकरकाम, हस्तकला व विणकाम व्यवसायाला घरघर लागली आहे. त्याचे कारण या व्यवसायाला कोणतेही शासकीय अनुदान किंवा कोणतीही योजना नाही दुसऱ्या व्यवसायापेक्षा या व्यवसायात मेहनत जास्त परंतु आर्थिक उत्पन्न कमी प्राप्त होत आहे. त्यामुळे आजच्या घडीला या व्यवसायासाठी व्यवसाय करणारा धनगर बांधव तयार नाही.

हा आरोग्यदायी व्यवसाय आणि विशेष हस्त कला टिकविण्यासाठी शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यास व्यवसाय नव्याने उदयास येवुन या व्यवसायातुन समाजाचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.

माझ्या आजोबांपासुन हा लोकरकाम व विणकाम व्यवसाय आम्ही आजही करत आहोत. घोंगडी, जीन इ. तयार करण्यासाठी मोठी मेहनत व वेळ लागत असते. त्यामुळे हा व्यवसाय आर्थिक दृष्ट्या पुरवडणारा नसुन जर शासनाने काही अनुदान सबसिडी, साहित्य, बँकेचे कर्ज मिळाल्यास या व्यवसायाला नवे दिवस येतील तथा या वस्तु समाजोपयोगी ठरतील.




निलेश बुधा आढावे
मो.९१५८९३०७६७

खादी उद्योग प्रमाणे लोकर उद्योगापासुन तयार झालेल्या वस्तुंना शासनाने जर स्टॉल, दुकाने किंवा इतर योजनेतुन विक्री केल्यास या व्यवसायाला खादी उद्योग प्रमाणे चालना मिळेल. दिवसेंदिवस हा व्यवसाय करण्यासाठी धनगर बांधव आर्थिक दृष्ट्या पुरवडत नसल्याने नाकारत आहे. परंतु शासनाने विविध विशेष योजना राबवुन लोकरकाम, विणकाम उद्योगाला महत्व प्राप्त झाले पाहिजे. या व्यवसायाला प्रशासनाने देखील आर्थिक मदत केली पाहिजे अशी देखील मागणी होत आहे.

**व्यवसाय पार्श्वभुमी**

१. मागील १०० वर्षापासुन हा व्यवसाय सुरु.
२. धनगर समाज हा मेंढीपालन करणारा प्रमुख समाज.
३. पुर्वी धनगर समाजाच्या घराघरात लोकरकाम, विणकाम हा व्यवसाय केला जायचा
४. कालानुरुप व्यवसाय किंवा लोकरी वस्तुंचे उत्पादन घटेल.
५. आजच्याघडीला लोकरकाम व विणकाम व्यवसाय करणारे आर्थिकदृष्ट्या पुरवडत नसल्याने संख्या कमी झाली.
६. शासकीय सहाकार्याची अपेक्षा व्यवसाय करणाऱ्यांची आहे.

## शब्दकोडे-२५८



**आडवे शब्द**

१. कृष्णाचा मित्र ६. जवळपास, सभोवती ९. ढीग ११. प्रत्येक वर्षी १३. रस्ता १४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर १६. दृष्टिभेट १९. पूर्ण भरतीची वेळ २०. नवा २२. पृथ्वी २३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे २६. प्रत्येक दिवशी, मजुरी २७. जास्त २९. लता, वेल ३०. टिंगल ३१. बोटाच्या टोकावर असते ते ३२. खरेदी ३४. जुने, ऐतिहासिक लेखन ३६. वटवट ३८. जबरदस्तीने (हिंदी) ४०. चेहऱ्याची निमुळती बाजू ४२. ज्वारीची रोटी ४४. माल ४५. हिंदीत कालवा ४६. भाकरी-पोळीचा पाव भाग ४८. अपऱ्या नाकाची ५०. बांबू ५२. आंब्याची पोळी ५४. मांडणी ५६. हिशोबात केलेला गोंधळ ५७. चक्र ५८. रामाचा एक भाऊ ५९. वजनदार ६०. व्यापारी ६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव ६२. अनुकंपा, करूणा ६३. स्तुतीस्तोत्र ६५. भांडण ६७. मागचे अंगण ६९. प्रत्यक्षात ७१. आशीर्वाद, वर ७३. परंपरागत गण वा संपत्ती ७४. शेत ७५. कावळा ७६. जनन ७७. बळी जाणारा ७८. काळ्या पाठीचे हरीण ७९. उत्तराधिकारी ८०. ताक फुंकून पिणारा ८१. मल्याळी भाषिक राज्य

**उभे शब्द**

१. श्रीकृष्णाचे आयुध २. दरवाजा ३. मत्स्य ४. आटोपते घेणे, आवरणे ५. जोरजबरदस्ती ६. कुंभाराची भट्टी, स्त्री ७. काचेचे पात्र ८. मध्यम प्रमाण ९. कृष्णसखी १०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक १२. नम्र १५. शिल्लक १७. असे असल्यास १८. धूळ २१. फायदा २४. नाजूकपणा नसलेले, भडक २५. प्रौढ, जून २६. थेट, स्पष्ट २८. ताणले जाणारे ३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख ३५. खणणे ३७. माळी, बागवान ४०. अडथळा, प्रश्न ४१. दरारा ४२. नशीब ४३. घोड्यावरून फेरी ४७. काटेरी औषधी वनस्पती ४९. अगदी थोडे ५१. नम्रपणे झुकलेला ५२. उंट हाकणारा ५३. अकस्मात ५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ५६. महासर्प ५९. संधी ६१. नगर ६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा ६४. सततची हालचाल ६६. पटकन ६८. रामदासांचा ग्रंथ ६९. बैलांचा सण, बेंदूर ७०. दरवाज्यावरचा आवाज ७२. दृष्टी ७४. माठ, गाडगे ७५. कारस्थान ७८. मृत्यू

### शब्दकोडे-२५७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.पंतप्रधान ४.हद्दपार ६.जिन्नस ९.रटाळ १०.आले ११.जीवन १३.हजरजबाबी १५.धवल १७.साकारणे १८.बळ १९.कर्म २१.मणेर २३.सरसहा २४.कमालकिमान २६.दरदरून २७.मान २८.भागवा ३०.दया ३२.मधमाशी ३५.नवरस ३६.दशानन ३७.शिंतोडा ३८.वखार ३९.कवी ४०.अंक ४१.वाटोळा ४३.डीर ४५.बार ४६.गणेश ४८.नाचा ४९.काव ५०.शुद्ध ५१.रसदार ५४.घोरपड ५६.कोडगा ५७.जारण ५८.कडवट ६०.सव ६१.बघे ६२.चोर ६३.सरल ६५.टकटक ६७.तारकस ६८.साखर ६९.कडक

**उभे उत्तर**

१.पंतोजी २.प्रधान कार्यालय ३.नरमणे ४.हळहळणे ५.पाचर ६.जिलेबी ७.सर्वधर्मसमभाव ८.आकलन १०.आबाळ १२.वसा १४.जबरदस्त १९.कर २०.मकरंद २१.मन २२.रदन २३.सनई २५.मानधन २६अ.सुवास २७.माशी शिंकणे २९.गरम ३१.यादवी ३२.मनधरणी ३३.खडावा ३४.सावळा ३५.नरडीचा घोट घेणे ४०.अंग झाडणे ४२.टोकदार ४४.सवड ४७.शर ४९.कापडचोपड ५०.शुभंकरोती ५२.सजावट ५३.रण ५५.अवसर ५९.टर ६०.सकस ६४.लता ६५.टक ६६.कसा

## ''मीनाकुमारी''

यादोंकी बारात
फैज अहमद, धुळेकर

फिल्मी चंदेरी जगात चंद्र काचेचा असतो आणि फुले गगदाची असतात, अश्या मुखवट्याची दुनियात मीना कुमारी एकदम ओरिजनल वाटायची,कारण तिच्या अभिनयचा गाभा संयम होता, स्वाभाविक आणि प्रभावी अभिनय हे तिचे वैशिष्ट्य होते.मोजक्या व कमीत कमी संवादातून व मोजक्या हालचालीतून ती संवाद व कथेचा आशय अचूक व्यक्त करीत होती. अनेकदा संवादाची गरज सुध्दा भासत नव्हती मीनाकुमारीचे मिटलेले ओठ व पाणावलेले डोळे तर बोलत होतेच पण, थरथरणाऱ्या पापण्या पण खूप काही सांगून जात होत्या.एका वाक्यात नजरेंने किंवा दबल्या ओटाने प्रेक्षांच्या काळजात ती येऊन बसायची, तिचा परिणीती चित्रपट फक्त तिच्या चालण्यासाठी पहावा.अस वाटेल कि याच भूमिके साठी तिचा जन्म झाला असावा. ती अभिनयात साखरे सारखी विरघळून जायची आणि पूर्ण चित्रपट गोड करून जायची.बैजू बावरा,बंदिश,एक ही रास्ता, चिराग कहां रोशनी कहां, शारदा, दिल अपना प्रीत पराई,फूल और पत्थर,चित्रलेखा,साहिब बिबी और गुलाम,पाकीजा,सारख्या चित्रपटातील भूमिकेशी ती इतकी एकरूप झाली की चित्र पूर्ण झाल्यावर तिला त्यापासून दूर करांव लागलं असेल.कोहिनूर चित्रपटात हातात सोटा घेऊन तिला मारामारी करावी लागली,तरी देखील तिने आपली शान कमी होऊ दिली नाही.तिचे संवाद म्हणजे तिचा आवाज सदोष होता,नूतन,वैजयंती माला,सारखी मधुर नव्हती,तिच्या आवाजाची पट्टी वहिदा रहमान सारखी खालची नव्हती.नर्गिसच्या आवाजातील करारी धार तिच्याकडे नव्हती. मधुबालाचा खट्याळपणा गीताबालीची लय नव्हती,तरी मीनाकुमारी शेवटी मीनाकुमारी होती. अभिनय जिवंत होता.प्रत्येक शब्दात तिच्या हृदयाची कैफियत जाणवत होती.



ऐसी जगह पर बदनसीब नही जाते,यहुदी चित्रपटातील हन्ना, औरतजात के लिये इतना बडा अपमान,इतानी बडी लज्जा,साहिब बिबी मधली छोटिबहू, पाकिजा मधली साहेब जान, तावायफों की कबरें खुली रखीं नही जाती, पाकीजा हा इतिहास आहे या महान अभिनेत्रीच्या कारकीर्दीचा.म्हणजे अभिनयाची परिसीमा होती मीनाकुमारी. ग्लीसिरींचा एक थेंबही न वापरता रडणारी व्याकूळ नायिका पडद्यावर दिसणार नाही.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# तळागाळातील शोषित वर्गाला न्याय देण्यासाठी छावा क्रांतिवीर सेना काम करणार

## सांगली जिल्ह्यात पहिल्या शाखेचे जल्लोषात उद्घाटन

### पदाधिकारी आढावा बैठक, नवनियुक्ती मोठ्या उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**





क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश महासचिव शिवाजीराजे मोरे, प्रदेश संपर्कप्रमुख नितीन शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष सुभाष गायकर, आयटी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव दळवी, जिल्हा सरचिटणीस सागर शेजवळ, प्रदेश संघटक महिला आघाडी अपर्णा माळी, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख महिला आघाडी अश्विनी नरगुंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये काल सांगली जिल्हा आढावा बैठक आणि नवीन पदाधिकारी निवड बैठक संपन्न झाली.

सांगली जिल्ह्यात छावा क्रांतिवीर सेनेचे वादळ निर्माण करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी संकल्प केला असून पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतात संघटनेची पदे आम्ही शोभेसाठी नव्हे तर तळागाळातील शोषित वर्गाला न्याय देण्यासाठी घेतो आहोत. पुढील एक महिन्यात महाराष्ट्रात एक नंबरचे काम सांगली जिल्ह्यात करून दाखवण्याची आम्ही सर्व एकमताने एक दिलाने काम करू व १ जानेवारी रोजी नाशिक येथे होणाऱ्या वर्धापन दिनासाठी हजारो पदाधिकारी नाशिकला येतील असाही शब्द यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांना दिला.

उपस्थित नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी सांगितले की, संघटना हा आपला आत्मा आहे. ज्या पद्धतीने आपण स्वतःच्या शरीराची काळजी घेतो, ज्या पद्धतीने स्वतःला जपतो त्याच पद्धतीने संघटनेला जपणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने महिनाभरात दिवसाला एक पदाधिकारी याप्रमाणे ३० पदाधिकारी जोडले तर सांगली जिल्ह्यामध्ये असे गाव शिल्लक राहणार नाही की तिथे छावा क्रांतिवीर सेनेचे नाव नसेल. तुम्ही सर्व पदाधिकारी ज्या पद्धतीने माझ्यासोबत ताकतीने उभे आहात हीच ताकद येणाऱ्या काळात महाराष्ट्रभर छावा क्रांतिवीर सेनेला यशोशिपरावर पोहोचविण्यासाठी कामी येईल. तुमच्या सगळ्यांचा आत्मविश्वास मला काम करण्यासाठी नवीन ऊर्जा देते येणाऱ्या काळामध्ये छावा क्रांतिवीर सेनेच्या माध्यमातून शेतकरी, सहकार, कामगार, महिला या सर्व घटकांना न्याय देण्यासाठी आपण प्रत्येक विभागात संघटनेच्या माध्यमातून निवेदने, उपवासाने वेळप्रसंगी आक्रमकपणे रास्ता रोको निदर्शने करून या सर्व सामाजिक घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करायचा आहे असे आवाहन करण गायकर यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन सांगली जिल्हा प्रमुख दीपक मुळीक, ग्रामीण जिल्हाप्रमुख संदीप गावडे, पश्चिम महाराष्ट्र चित्रपट आघाडी अध्यक्ष प्रमोद थोरबोले, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष आशिष मुळीक, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष नेहा कुंभार, ग्रामीण महिला जिल्हाध्यक्ष रेखा कापसे आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# खर्गेपुत्राच्या वक्तव्याचा भाजयुमोतर्फे पुतळा दहन करून निषेध

**नाशिक । वार्ताहर**



काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र व काँग्रेसचे कर्नाटकातील मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर निषेधार्ह वक्तव्य केले. सदर वक्तव्याचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शहरातील रेडक्रॉस सिग्नल येथे तिरडी आंदोलन करण्यात आले.

खर्गे यांनी आपल्या वक्तव्यात सावरकरांची प्रतिमा कर्नाटक विधानसभेतून काढून टाकण्यात यावी अशी मागणी केली. याविरोधात देशभरातील राष्ट्रप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विविध स्तरांवरून या वक्तव्याचा निषेध होत आहे. भाजयुमो, नाशिक तर्फे काल सकाळी रेडक्रॉस सिग्नल येथे तिरडी आंदोलन करत खर्गेंचा निषेध नोंदवण्यात आला. यावेळी अध्यक्ष सागर शेलार म्हणाले, काँग्रेसचा सावरकर द्वेष जगजाहीर आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या सूर्यावर आरोप करण्याची लायकी नाही. सावरकरांवर सतत गरळ ओकणाऱ्या काँग्रेससोबत असलेल्या उद्धव ठाकरे व संजय राऊत यांनी आता स्वतःची भूमिका स्पष्ट करावी. सोयीचे हिंदुत्व आणि सावरकरद्वेष्ट्या काँग्रेस बाबत दुटप्पी भूमिका हाच ठाकरेंच्या सत्तालोभाचा खरा चेहरा आहे असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, सरचिटणीस नाना शिलेदार, वसंत उशीर, शहर उपाध्यक्ष मीनल भोसले, प्रदेश महामंत्री योगेश मैंद, प्रदेश उपाध्यक्ष अनिकेत पाटील, क्रीडा संयोजक विजय बनसोडे, महिला मोर्चाच्या सोनाली ठाकरे, सरचिटणीस शिवा जाधव, डॉ. वैभव महाले, प्रशांत वाघ, प्रवीण भाटे, अमोल पाटील, पवन उगले, विनोद येवले, सचिन मोरे, संदीप शिरोळे, कमलेश पिंगळे, सौरभ निमसे, तुषार नाटकर, उमेश शिंदे, गौरव घोलप, गौरव केदारे, सचिन शेजवळ, अंकुश जोशी, शरद आढाव, विशाल पगार, निलेश पवार, आकाश मोरे, विक्रांत गांगुर्डे, विशाल पगार, प्रतीक शुक्ल, मुफद्दल पेंटर, भाविक तोरवने, अनिकेत सोनवणे, ऋषिकेश शिरसाठ, अमित चव्हाण, विजय गायखे, रविंद्र गांगुर्डे, पार्थ मानकर, हर्षल आहेर, राज चव्हाण, ऋषिकेश फुले, भूषण शाहाने, सुरज चव्हाण, शुभम जाधव, वैभव दराडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व सावरकरप्रेमी उपस्थित होते.

# केंद्र शासनाने लागु केलेल्या कांदा निर्यात बंदीचा पुर्न:विचार करावा : सुवर्णा जगताप

**लासलगाव । वार्ताहर**



केंद्र शासनाने दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत कांदा निर्यात बंदी केल्याबाबत अधिसुचना प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे दि. ०८ डिसेंबर, २०२३ रोजी नाशिक जिल्ह्यातील बहुतांश बाजार समित्यांमध्ये केंद्र शासनाच्या सदर निर्णयामुळे कांदा बाजारभावात घसरण झाल्याने शेतकरी बांधवांनी अनेक ठिकाणी कांदा लिलावाचे कामकाज बंद पाडले असुन रस्ता रोको आंदोलन सुरू केलेले आहे.याबाबत लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा जगताप यांनी वाणिज्य मंत्री पियुष गोयल,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्य मंत्री डॉ भारती पवार यांना पत्र लिहून केंद्र शासनाने लागु केलेल्या कांदा निर्यात बंदीचा पुर्नःविचार होणेबाबत विनंती केलेली आहे.

शुक्रवार, दि. ०८/१२/२०२३ रोजी लासलगांव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारावर ४२२ वाहनांमधुन लाल (खरीप) कांदा तर ६१ वाहनांमधुन उन्हाळ (रब्बी) कांदा विक्रीस आला होता त्यापैकी लाल (खरीप) कांदा साठविण्यायोग्य नसल्याने शेतक-यांना सदर कांदा काढणीनंतर लगेच विक्री करण्याशिवाय कोणताही पर्याय नसतो.त्यामुळे दरवर्षी बाजार आवारांवर लाल (खरीप) कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होते. सद्यस्थितीत लासलगांव बाजार समितीत कांद्याची दररोज ०९ ते १० हजार क्विंटलची आवक होत असुन लवकरच बाजार आवारावर लेट खरीप (रांगडा) कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू होणार असल्याने डिसेंबर अखेर आवकेत अजुन वाढ होण्याची शक्यता आहे. परंतु केंद्र शासनाने कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतल्याने शेतकरी बांधवांमध्ये केंद्र शासनाच्या ध्येय धोरणांबाबत असंतोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी लासलगाव मुख्य बाजार आवारावर दैनंदीन कांदा लिलावाचे कामकाज सुरू होऊ दिले नाही. सदर निर्णयामुळे शेतकरी बांधवांना सध्या कांदा या शेतीमालास जो काही दर मिळत होता. त्यावर मोठ्या प्रमाणावर परीणाम होऊन शेतकरी बांधवांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

# हभप गोरख महाराज थेटे यांची तालुका सहअध्यक्ष पदी निवड

**नाशिक । प्रतिनिधी**

दुगांव ता.नाशिक येथील वारकरी संप्रदायाचे उपासक व निष्ठावंत वारकरी वास्तूविशारद हभपश्री गोरख महाराज थेटे यांची जिल्हाध्यक्ष हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी नाशिक तालुका सह अध्यक्षपदी नुकतीच



नियुक्ती केली आहे.तसे नियुक्ती पत्र हभपश्री आहेर महाराज यांनी दिले आहे. त्यांचे निवडीचे दुगांव समस्त गांवकरी, भजनी मंडळ वारकरी मंडळ भजनी मंडळ, गुरु दत्त भजनी मंडळ, भिवाजी गणपत थेटे, उत्तम महाराज जाधव, माधव बापुजी शिंदे, रामदास रामचंद्र नवले,सुनिल शिवराम थेटे, सोमनाथ दत्तात्रय शिंदे, हरिभाऊ तुळशीराम थेटे, मच्छिद्रनाथ बाबुराव थेटे, सुनिल नारायण थेटे, राजेंद्र शिवाजी थेटे, हिरामण पोपट थेटे, पुंजाराम निवृत्ती थेटे, शिवदास नामदेव वाघ,पोपट सिताराम थेटे, राजेंद्र संपत चव्हाण, सुरेश गायकवाड, मयुर संतोष नळवाडे, आकाश हरिभाऊ थेटे, तसेच दुगांव पंचक्रोशीतील सर्व वारकरी, भाविक, भजनी मंडळे यांनी अभिनंदन व स्वागत केले आहे.

# भाजपा नाशिक महानगर अनुसुचित जाती मोर्चाची कार्यकारिणी घोषित








**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपा नाशिक महानगर अनुसुचित जाती मोर्चा कार्यकारणी अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष राकेश दोंदे यांनी घोषित केली. भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली. सदर कार्यकारणी प्रदेश भाजपने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केली असल्याचे अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष राकेश दोंदे यांनी पत्रकात म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे, ना.गिरीष महाजन, भाजपा प्रदेश महामंत्री विजय चौधरी व विक्रांत पाटील, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दिलीप कांबळे, आ.राहुल ढिकले, आ.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदिप पेशकार, गोविंद बोरसे, अनुसुचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष गणेश कांबळे, बाळासाहेब सानप, विजय साने, सतिश कुलकर्णी, भाजपा नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या विशेष मार्गदर्शनाने आणि भाजपा नाशिक शहर सरचिटणीस सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, ॲड.श्याम बडोदे, हिमगौरी आडके, रोहीणी नायडू वानखेडे, महानगर मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे नाशिक महानगर अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष - राकेश दोंदे, उपाध्यक्ष - डॉ. पुनम सोनवणे, आशा कांबळे, सुरेखा केदारे, प्रविण नन्नावरे, लक्ष्मण पगारे, दशरथ गांगुर्डे, अनिल मोरे, मदन निकम, संतोष गायकवाड, सुनिता वाव्हळ, देविदास शिरसाट, आंबादास आहिरे, मोनु वाघमारे. सरचिटणीस - भगवान दोंदे, कुंदन खरे, गजानन रणबावळे, राजीव मोरे, कविता तेजाळे, चिटणीस - राजश्री शिंदे, वैशाली त्र्यंबके, उषा ताठे, अविनाश गांगुर्डे, रविंद्र जामकर, ज्ञानेश्वर साळवे, वामन (नाना) खंडाळे, सुधाकर वाटोरे, गोपाळ रणशिंगे, नाना नेटावटे, मनोज साळवे, सुजित मोरे यांचा समावेश आहे.

# मुकेश आर. पटेल स्कूल मध्ये इंग्लिश स्पेल बी स्पर्धा संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई, संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूल मध्ये इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांची स्पेल बी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतून शब्द भांडार, शब्दांच्या उत्पत्तीचे ज्ञान वाढणे, अक्षरे व ध्वनी, संघ बांधणी आणि आत्मविश्र्वास वाढण्यास मदत होते या दृष्टीने शाळेत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. सरस्वती वंदना करुन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत चित्र ओळखून शब्दाचे स्पेलिंग सांगणे, शब्दातील गाळलेले अक्षर ओळखणे, कोडे ओळखणे, योग्य शब्द ओळखणे, आवाज ओळखणे व रॅपिड फायर अशा एकूण सात फेऱ्या घेण्यात आल्या. सर्वोच्च गुणसंख्येसह चॅरिटी हाऊसने प्रथम क्रमांक मिळवला तर पीस हाऊसने द्वितीय व जॉय हाऊसने तृतीय क्रमांक मिळवला.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुकसान भरपाई द्यावी

### मुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांना आम आदमी पार्टीचे पत्र

**नाशिक । प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी आपच्या पदाधिकाऱ्यांनी संवाद साधत त्यांना दिलासा प्रयत्न केला आहे. या पाहणी दरम्यान जवळपास सर्वच पिकांचे खूप मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. काही शेतकरी तर आमच्या जवळ ढसाढसा रडलेत, कारण त्यांची पूर्ण वर्षाची कमाई अवकाळी पावसामुळे पाण्यात गेली आहे. काहींनी सांगितले की, बँकेचे कर्ज आता कसे फेडू? आम्हाला आता आत्महत्या करण्यापलीकडे काहीही पर्याय नाही अशा प्रकारचा विदारक प्रसंग शेतकऱ्यांनी आम आदमी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांकडे मांडला आहे. या पार्श्र्वभूमीवर पक्षातर्फे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांकडे आम आदमी पार्टीने पत्र पाठवून केली आहे.

या पाहणी दौऱ्यात काही शेतकऱ्यांनी सांगितले की, आमच्या मुलीचे लग्न कसे करू, काहींनी सांगितले की आमच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी कसे पाठवू असे बोलून दाखविले आहे. शेतकऱ्यांची विधारक परिस्थिती पाहता त्यांना अतिशय तातडीने मदत देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे पत्र आम आदमी पक्षातर्फे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री तसेच कृषी मंत्र्यांकडे एका पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे.

या पत्रात पक्षाचे नविंदर अहलुवालिया यांनी म्हटले आहे की, एकनाथ शिंदे आपण राज्याचे प्रमुख आहात या नात्याने आपल्या राज्यातील ह्या नैसर्गिक अवकृपेमुळे ओढवलेल्या परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांचे परिवार उध्वस्त झाले आहेत. त्यांना सावरण्याची जबाबदारी आपली आणि कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची आहे. त्यामुळें आपण जबाबदारी ओळखून तात्काळ मदत पोहोचवावी. यामुळे जेणेकरून शेतकरी पुढील पिकांच्या पेरणीची तयारी करतील.

तर चंदन पवार यांनी म्हटले आहे की, एकनाथ शिंदे आपण स्वतः शेतकरी आहात त्यामुळे शेतकऱ्यांचे दुःख आपल्याला चांगल्या प्रकारे समजू शकते. हाच धागा पकडून शेतकऱ्यांची परिस्थितीला पुन्हा रुळावर आणण्यासाठी आम आदमी पार्टी आपल्याकडे महत्वाच्या मागण्या करीत आहे कृपया आपण त्या पूर्ण कराल याची खात्री आहे. अजूनही शेतकरी मदतीपासून वंचित आहेत याकडे आपण लक्ष केंद्रित कराल अशी विनंती दिलेल्या पत्रात करण्यात आली आहे. यासंबंधीचे मागणी पत्र नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्यामार्फत देण्यात आले आहे. यावेळी राज्य संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, राज्य मिडिया प्रमुख चंदन पवार, नासिकचे पदाधिकारी गिरीश उगले पाटील, प्रविण पगारे, एकनाथ सावळे आदी उपस्थित होते.

# अभ्यासाला कला-कौशल्याची जोड उपयुक्त - पाठक

**नाशिक । प्रतिनिधी**






विद्यार्थ्यांनी दैनंदिन अभ्यासाला कला - कौशल्याची जोड द्यावी. व्यक्तिमत्व विकासाला ते उपयुक्त ठरते. रोटरी क्लब सदस्यांनी त्यासाठी पुढाकार घेऊन निरागस बालकांवर कलेचे संस्कार केले. त्याचा सराव पुढील काळात मुले जरूर करतील असे प्रतिपादन आधाराश्रमाचे कार्यवाह हेमंत पाठक यांनी केले.

दिवाळीच्या पूर्वी रोटरी क्लबचे सदस्य आधारआश्रमातील मुला, मुलींना चित्रकला, हस्तकला, गाणी, नृत्य आदी कलाकौशल्ये शिकवायला येत होते. सुमारे तीन महिने दररोज दोन तास हा उपक्रम चालला. काल त्याच्या समारोपाचा कार्यक्रम घारपुरे घाटावरील आधाराश्रमाच्या सभागृहात आयोजीत करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबच्या या उपक्रमाच्या प्रमुख उर्मी दिनानी, उर्मिला देवधर व्यासपीठावर उपस्थित होत्या. तीन महिन्यांच्या कालावधीत चित्रकला व हस्तकला अनुजा चौघुले वहेतल गाला यांनी शिकवली. सोनाली व रचना चिंधडे यांनी नृत्य व गायनाचे सराव करून घेतले.

राजेश्वरी बालाजीवाले व तेजल शाह यांनी कथाकथन, नाट्याची गोडी लावली. दमयंती बराडिया व तेजल शाह यांनी गायनाचे प्रकार समजावून दिले. गौरी कुलकर्णी व रुपाली शाह यांनी वैयक्तिक स्वच्छता कशी राखवी याचे धडे दिले तर उर्मी दिनानी व गौरव संगमनेरकर यांनी श्लोकपठणाचे संस्कार केले.

कालच्या कार्यक्रमात मुला मुलींनी काही गाणी, नाट्य सादर केली. या स्नेहमय कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन समन्वयक राहुल जाधव यांनी केले. आधाराश्रमाचे अध्यक्ष विजय दातार यांच्या हस्ते सर्व मान्यवरांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तर कीर्ती थिटे यांनी आभार मानले.

# गावरान बकरीने दिले चक्क पाच पिल्ले

**लासलगाव । प्रतिनिधी**



निसर्ग अनेक चमत्कारिक गोष्टीनी भरला आहे,त्यात अनेक असामान्य गोष्टी बघायला मिळतात.शिरवाडे वाकद ता.निफाड येथे अशीच एक चमत्कारिक गोष्ट बघायला मिळाली ती म्हणजे गावरान शेळीने चक्क पाच पिल्लांना जन्म दिला आहे.

कधी अत्यल्प पर्जन्यमान तर कधी अतिवृष्टी मुळे दिवसेंदिवस शेतीच्या उत्पन्नात घट होत असल्याने पर्यायी जोडधंदा म्हणून पाळलेल्या एका बकरीने चक्क पाच पिल्ले दिल्याची घटना शिरवाडे वाकद येथे घडल्याने या शेतकऱ्याच्या घरी आनंदाची दिवाळी उजळल्याचे चित्र आहे.येथील शेती व्यावसायिक किरण आवारे हे बऱ्याच दिवसांपासून वडिलोपार्जित शेती करतात.त्यांना वडगाव पंगू ता.चांदवड येथील नातेवाईकांनी एक बकरी भेट दिली.या बकरीच्या विस्ताराने पाच वर्षात तब्बल एक लाखाच्या वर आर्थिक कमाई दिली.निसर्गाच्या अवकृपेमुळे दिवसेंदिवस शेतीचे उत्पन्न घटत असल्याने शेतीला जोडधंदा म्हणून शेळी पालन व्यवसाय कुटुंबाला चांगलाच आर्थिक आधार झाला आहे. त्यातच गावरान बकरीला 'निसर्गाची किमया न्यारी' झाली अन् या बकरीने दुसऱ्या वेतात चक्क पाच पिल्ले दिल्याने कुटुंबियाच्या घरी आनंदाचे वातावरण पसरले आहे.ही सर्व पिल्ले सुस्थितीत असून या बकरीला पहिल्या वेतात तीन पिल्ले झाली होती. शेतकऱ्यांना कमी चाऱ्यात व कमी जागेत शेळी पालन व्यवसाय करणे फायदेशीर आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीपूरक जोडधंदा म्हणून शेळीपालन व्यवसायाकडे वळणे गरजेचे आहे. म्हणून शेळी पालकांनी अशा बकरीचे मोठ्या प्रमाणात पालन करावे असे आवारे यांनी सांगितले.

## न्यूज कॉलम

### चेन स्नॅचिंग, मोबाईल हिसकावला

**नाशिक ।** शहरात घडलेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत तसेच युवकाच्या हातातील मोबाईल हिसकावून नेल्याचा प्रकार उघडकीस आला. शुक्रवारी (ता. ८) सायंकाळी सातच्या सुमारास सीमा मराठे (रा. मखमलाबाद रोड) त्यांच्या घराकडे चालल्या असताना दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळ्यातील पोत ओरबडली.

### भूलथापा देत दागिने, मोबाईल चोरले

**नाशिक ।** मोफत धान्याचे आमिष दाखवत व गप्पांमध्ये भुलवत चोरट्यांनी दागिने व मोबाईल असा ३० हजार रुपयांचा ऐवज लांबवत वृद्ध महिलेला गंडविले. सराफ बाजार परिसरात घडली. या प्रकरणी हुसना बी. इसाक खान (रा. भद्रकाली) यांनी सरकारवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# वंचित घटकांना मिळतोय विविध योजनांचा लाभ

### नरडाणा येथे विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त कार्यक्रम संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**





विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून सर्वसामान्य, वंचित, महिला, युवक, शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ.सुभाष भामरे यांनी नरडाणा येथे केले.

भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थींपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. या यात्रेचा शुभारंभ आज नरडाणा येथे खासदार डॉ. भामरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास आमदार जयकुमार रावल, जिल्हा परिषदेचे महिला व बालविकास सभापती संजीवनी सिसोदे, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती भाऊसाहेब पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक बाळासाहेब बोटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कुरबान तडवी, प्रकल्प अधिकारी प्रमादे पाटील, गट विकास अधिकारी प्रदीप पवार, सरपंच मनीषा सिसोदे, उपसरपंच जागृती सिसोदे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समिती सदस्य,सभापती, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार डॉ.भामरे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ९ वर्ष पूर्ण झाले असून या कालावधीत समाजातील सर्व घटकांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने ७५ प्रकारच्या योजना सुरु केल्या आहेत. या विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून २०४७ पर्यंत भारताला विकसित भारत करण्याचा संकल्प आहे. शेवटच्या घटकातील नागरिक, महिला, शेतकरी, युवा यांचा सर्वांगिण विकास झाला तरच विकसित भारत होण्याचा संकल्प पुर्ण होणार आहे. केंद्र सरकारने कोरोनाकाळात १४० कोटी जनतेला कोविड प्रतिबंधक मोफत लस देण्यात आली. त्याचप्रमाणे भारतातील ८० कोटी गरीब जनतेला गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून मोफत अन्नधान्य पुढील पाच वर्ष पर्यंत देण्यात येत आहे. गरीबासाठी केंद्र सरकारने अनेक योजना राबविल्या आहे. या विविध योजनांचा लाभ गरीब, वंचित, दुर्बल घटकापर्यंत पोहचावा यासाठी या विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आयुष्यमान भारत योजने सारखी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेच्या माध्यमातून ५० कोटी जनतेला आयुष्मान कार्ड देण्याचे उद्दिष्ट आहे. या कार्डच्या माध्यमातून ५ लाखापर्यंत विविध आजारावर मोफत उपचार मिळणार आहे. धुळे जिल्ह्यात जवळपास १ लाख लाभार्थ्यांनी अद्याप पर्यंत आयुष्मान भारत कार्ड काढलेले नाही, त्यामुळे या यात्रेच्या माध्यमातून ज्यांना हे कार्ड मिळाले नाही त्यांची नोंदणी करुन ते तयार करुन घ्यावे. आज सकाळपासून जवळजवळ २३० लाभार्थ्यांना हे कार्ड देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# वरवाडे येथे आयुष्यमान भारत योजना मोहिम उत्साहात संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

वरवाडे येथे भूपेशभाई फ्रेंड सर्कल तर्फे आयुष्मान भारत योजना मोहिम उत्साहात संपन्न झाली.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना म्हणजे आयुष्यमान भारत यादीमध्ये नाव असणे आवश्यक असल्याने शासकीय व खाजगी रुग्णालयात मोफत उपचारासाठी आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्षा सौ.जयश्रीबेन पटेल, माजी उपनगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपा शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल, माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के.डी.पाटील, माजी नगरसेविका सौ.चंद्रकला संतोष माळी, माजी नगरसेवक दिपक महादु माळी यांच्या नेतृत्वाखाली वरवाडे वार्ड नं. १३ मध्ये संपूर्ण परिसरातील जनतेसाठी ७ व ८ डिसेंबर या दोन दिवसात भूपेशभाई फ्रेंड सर्कलने संत सावता माळी मंदीरात व श्री.म्हाळसादेवी मंदीरात ४०५ आयुष्मान कार्ड के.वाय.सी. करण्यात आले. शिरपूर आमदार कार्यालयातीलविकास योजना आपल्या दारी अभियान स्वयंसेवक, भूपेशभाई फ्रेंड सर्कलचे स्वयंसेवक अनिल सोनवणे, पवन पावरा, आकाश बागले, आशा वर्कर वैशाली बुवा यांनी प्रयत्न केले.

# रोटरी क्लब धुळे तर्फे व्होकेशनल ॲवार्ड्सचे वितरण

**धुळे । प्रतिनिधी**



अनेकविध सामाजिक उपक्रमांसाठी सातत्याने अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड तर्फे चार दिवसांच्या व्यावसायिक प्रदर्शनाचे अर्थात धुळे फेस्टिव्हल चे आयोजन मालेगाव रोडवरील गिंदोडिया कंपाऊंड येथे गुरुवार पासून करण्यात आले असून रविवारी रात्री या लोकप्रिय प्रदर्शनाचा समारोप होत आहे.

गत तीन चार दिवसात असंख्य धुळे करांनी धुळे फेस्टिव्हल ला भेट देऊन रोटरी क्लबचा हा लोकप्रिय प्रकल्प आपल्या उपस्थितीने यशस्वी केला आहे. रोटरी क्लबचे प्रांतपाल, पीडीजी, एजी आदी मान्यवर पदाधिकारी यांनी धुळे फेस्टिव्हल ला भेट दिली आहे. काल शनिवारी सायंकाळी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात रोटरी क्लब च्या सामाजिक उत्तरदायित्वा अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमात कार्यरत असलेल्या समाजसेवकांची व्होकेशनल ॲवार्ड्स देऊन गौरविण्यात आले. धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयातील आरोग्य सहाय्यक व जवाहर सूतगिरणी चे जनसंपर्क अधिकारी गोकुळसिंग राजपूत, जिल्हा शासकीय रुग्णालयातील शवविच्छेदन कक्षातील सहाय्यक संदिप रणजित गोयर, शिरुड ता जि धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते व रुग्ण सहायक चित्तरंजन विजय कुलकर्णी, मातोश्री वृध्दाश्रम येथील व्यवस्थापक धिरज शिवा धनगर, जिल्हा रुग्णालयातील परिचारिका सौ प्रतीभा घोडके , सामाजिक कार्यकर्ते अन्सारी रईस अहमद कादीर (रईस हिंदुस्थानी ) यांना सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल व्होकेशनल ॲवार्ड्स देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक मा श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, कमर शेख अजित राजपूत यांनी सूत्रसंचालन केले व सचिव सचिन बोरसे यांनी आभार मानले.

# विश्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे ३१३ रुग्णांची तपासणी

**नाशिक ।** विश्र्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे बाळदे गावात ३१३ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येऊन औषधी वाटप करण्यात आले. बाळदे गावात १० डिसेंबर रोजी ३१३ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येऊन डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मोफत औषधी देण्यात आली. या वेळी सरपंच सौ. मंदाबाई गरबड भिल, उपसरपंच निंबा तोताराम पाटील, ग्रामसेवक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामी डॉ. निनाद हर्षद शाह (एम. डी.), डॉ. सुनील सी. पावरा (एम.बी.बी.एस.), डॉ. विजेंद्र एल. पाटील (एम.एस.) यांनी आरोग्य निदान केले व फार्मासिस्ट सरीता जमादार, अश्र्विन पाटील दिव्यांग खैरनार यांनी औषध वितरण केले. यानंतर १७ डिसेंबर २०२३ रोजी हाडाखेड, पिंप्राड पाडा या गावात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे प्रबंधक कमिटीने कळविले आहे.

# धुळे जिल्हा परिषदेत घेण्यात आलं रक्तदान शिबीर

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सरकारी रुग्णालय तसेच खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी रक्तसाठा असणे महत्वाचे आहे. रक्त उपलब्ध होण्यापासून रुग्ण वंचित राहता काम नये.

या जाणिवेतून हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांनी शासकीय विभागाला रक्तदान शिबीर घेण्याचे सूचित केले होते. त्यानुसार धुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी बैठक घेऊन शासकीय यंत्रणांसह खासगी स्वयंसेवी संस्थांना रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले होते. त्यास तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत धुळे जिल्हा परिषदेचे पदाधिकारी तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संघटनेतर्फे रक्तदार शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. हे रक्तदान शिबीर धुळे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शुक्रवारी पार पडलं. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने व उत्स्फूर्तपणे रक्तदान करून अधिष्ठाता व जिल्हाधिकारींच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला. सकाळी ९ वाजता सुरु झालेल्या या रक्तदान शिबिरात दुपारी दोन वाजेपर्यंत अडीचशे रक्तदानाच्या पिशव्या संकलित झाल्या होत्या. सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबीर सुरु होतं.

# बोरकुंड- रतनपुरा गटातील ग्रामीण रस्त्यांसाठी साडेतेरा कोटींचा निधी मंजूर

### आ.मंजुळा गावित व बाळासाहेब भदाणे यांच्या पाठपुराव्याला यश





**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील बहुतांश रस्त्यांची कामे ही, निधीअभावी वर्षानुवर्ष रखडली आहे. ग्रामीण भागाच्या धमन्या समजल्या जाणार्या या रस्त्यांच्या कामांसाठी बाळासाहेब भदाणे यांनी शासनस्तरावर भक्कम पाठपुरावा चालविला होता. आ.मंजुळाताई गावित यांच्या माध्यमातून केलेल्या या पाठपुराव्याला यश आले असुन, बोरकुंड-रतनपुरा गटासाठी तब्बल साडेतेरा कोटींची कामे मंजूर झाली आहेत. या दोन्ही गटांतील रस्ते यामुळे चकाचक होणार असल्याने ग्रामीण जनतेतुन समाधान व्यक्त केले जात आहे.

ग्रामीण भागातील, जिल्हा परिषद अंतर्गत असलेले रस्ते वर्षानुवर्ष काम न झाल्याने दुरावस्थेत आहेत. निधीअभावी या रस्त्यांची कामे हाती घेतली जात नाही. परिणामी हे रस्ते वाहतुकीस अयोग्य झाली असुन, यामुळे ग्रामीण भागातील जनतेला मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. यात बोरकुंड ते तरवाडे रस्ता ग्रा. मा.१२३ कि.मी. ४/०० ते ६/०० रस्ता सुधारणा करणेसाठी अडीच कोटी रुपये, जुनवणे ते हेन्दून रस्ता ग्रा.मा. १२६ कि.मी. २/०० ते ४/०० रस्ता सुधारणा करणेसाठी २ कोटी रुपये, सिताणे ते पिंजारपाडे ग्रामा-७७ १/०० ते ३/०० रस्ता सुधारणा करणेसाठी १ कोटी रुपये, धाडरे - हयादळ रस्ता ग्रामा १४२ किमी १/०० ते ३/०० रस्ता सुधारणा करणेसाठी दीड कोटी रुपये, नाणे ते होरपाडे रस्ता ग्रामा १८८ किमी १/०० ते ४/०० रस्ता सुधारणा करणेसाठी दीड कोटी रुपये, बोरकुंड - रतनपुरा ते रवाजे शिवार रस्ता ग्रामा ८६ रस्ता सुधारणा करणेसाठी ३ कोटी रुपये व रामा २११ ते नाणे रस्ता प्रा. मा. १२२ किमी १/०० ते ४/०० रस्ता सुधारणा करणेसाठी २ कोटी रुपये, असे एकुण ७ रस्त्यांसाठी साडेतेरा कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. बोरकुंड- रतनपुरा जिल्हा परिषद गटात आ.मंजुळाताई गावित यांच्या माध्यमातून व बाळासाहेब भदाणे यांच्या पाठपुराव्याने, एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मंजूर मिळाल्याने दोन्ही गटांच्या रस्ते विकासाचा अनुशेष भरून निघणार आहे. जिल्हा परिषद सदस्य शालिनीताई भदाणे, अनिता प्रभाकर भदाणे, पंचायत समिती उपसभापती देवेंद्र माळी यांसह परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहेत.

# लिलाव बंदमुळे कोट्यवधींची उलाढाल ठप्प

**नाशिक ।** कांद्याची निर्यातबंदी केल्यानंतर सलग दुस-या दिवशी शनिवारी (ता.९) कांदा उत्पादक शेतक-यांची संतापाची लाट कायम होती. संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शनिवारी (ता.९) नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको करून आंदोलन केले. केंद्र सरकारने त्वरित कांदा निर्यात बंदी मागे घ्यावी अन्यथा नाशिक जिल्ह्यातील एकही किलो कांदा बाहेर जाऊ देणार नाही, असा इशारा शेतक-यांनी दिला. दरम्यान जिल्ह्यातील विंचूर वगळता सर्व कांदा लिलाव बंद होते. त्यामुळे कोट्यवधींची उलाढाल ठप्प होती.

# कांदा निर्यात बंदीविरोधात शेतकरी आक्रमक; येवल्यामध्ये रास्ता रोको

**येवला । प्रतिनिधी**



केंद्र सरकारने नुकतीच निर्यात बंदी जाहीर करण्यात आली असून मनमाड नगर महामार्गावर शेतकरी पदाधिकारी यांनी रास्ता रोको केला असून बाजार समिती समोर शेतकऱ्यांनी आंदोलन केले. केंद्र सरकारने कांद्यावर अचानकपणे शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर रोजी निर्यात बंदी लादल्याने कांद्याचे भाव पडले आहे. आधीच अवकाळी व गारपिटीमुळे लाल कांद्याचे नुकसान झाले आहे, त्यातच शेतकऱ्यांकडे कांदा शिल्लक नाही नसून त्या कांद्यात थोडाफार भाव मिळत असल्याने केंद्र सरकारने शहरी लोकांचा विचार करत तातडीने निर्यात बंदी लादली. मात्र यामुळे चार हजार रुपये विकणारा कांदा अचानक २००० पेक्षाही खाली विकायला सुरुवात झाली त्यात कृषी उत्पन्न बाजार समिती देखील आता लिलाव बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचा संताप झाल्याचे पहायला मिळत आहे. शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असल्याने राज्यशासनाने तातडीने पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे. यावेळी महामार्ग जाम करण्यात आला व केंद्र सरकार व राज्य सरकार विरोधात घोषणा देण्यात आल्या. याबाबत विधानसभेतही पडसाद उमटले असून शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असून राज्य सरकारने केंद्र सरकारकडे तातडीने निर्यात बंदी उठवण्याची मागणी करावी. सध्या शेतकरी संघटना व शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत.

# पटेल कन्या विद्यालयात विज्ञान प्रदर्शन स्पर्धा संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



येथील एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च विद्यालयातील अटल टिंकरिंग लॅब मध्ये ९ डिसेंबर २०२३ रोजी शालेय स्तर विज्ञान प्रदर्शन स्पर्धा संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सीईओ डॉ.उमेश शर्मा, अर्कॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

स्पर्धेचे नियोजन प्राचार्य आर.बी.पाटील व पर्यवेक्षक जे.पी.पाटील यांनी केले. स्पर्धेत दोन गट करण्यात आले होते. इयत्ता नववी ते बारावी मोठा गट व इयत्ता सहावी ते आठवी लहान गट यात मोठ्या गटात एकूण ६४ विद्यार्थिनी तर लहान गटात एकूण ४८ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

# पटेल मराठी प्राथमिक शाळेत मम्मीजी क्रीडा महोत्सव साजरा

**शिरपूर । प्रतिनिधी**

शहरातील सुभाष कॉलनी येथील आर.सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत ५ डिसेंबर रोजी पूर्व प्राथमिक विभागासाठी मम्मीजी क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तद्नंतर मम्मीजी व सरस्वती यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

सदर क्रीडा महोत्सवात इयत्ता नर्सरी व बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या शर्यतींचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी माकड, ससा, फुलपाखरू, हत्ती, कांगारू हनुमान इ. वेगवेगळ्या वेशभूषा धारण केल्या होत्या. आभार महेंद्र माळी यांनी मानले.

# देवरे अभियांत्रिकीत मशिन लर्निंग विषयावर कार्यशाळेचे आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**



श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभागातर्फे अंतिम वर्ष तंत्रशास्त्र विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स व ऑटोमेशन क्लब तर्फे मशिन लर्निंग अँड डाटा ॲनॅलिटिक्स या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळेचे काल महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते.

वेल्लोर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी वेल्लोर तामिळनाडू येथील डॉ हेमप्रसाद पाटील या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले याप्रसंगी ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभाग प्रमुख प्रा डॉ पी एस पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून व दिपप्रज्वलनाने कार्यशाळेचा औपचारिक शुभारंभ झाला. कार्यशाळेच्या समन्वयक प्रा सौ दिपाली भामरे, प्रा सौ पल्लवी साळुंके यांनी कार्यशाळेचे उत्तम संयोजन केले, त्यांना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल बोरसे व शिवम गायकवाड यांनी सहाय्य केले. मार्गदर्शक प्रा डॉ हेमप्रसाद पाटील यांनी विद्यार्थ्यांना कार्यशाळेत मार्गदर्शन करताना पायथॉन प्रोग्रॅमिंग, नम्पी, स्कीपी, मशीन लर्निंग अलगोरिदम परफॉर्मन्स मॅट्रिक्स, ॲप्लीकेशन ऑफ मशीन लर्निंग इन डाटा ॲनॅलिटिक्स या विषयांवर तीन सत्रात सविस्तर मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख प्रा डॉ पी एस पाटील यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले, प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यशाळेतून विशेष तांत्रिक कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले व सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रा सौ दिपाली भामरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळा सर्व विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क होती व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. ईलेक्ट्रॉनिक्स, ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स्, संगणक विभागातील मिळून शंभरहून अधिक विद्यार्थी विद्यार्थीनी कार्यशाळेत सहभागी झाले होते. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल पाटील व महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादासाहेब सुभाष देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभागाने या कार्यशाळेचे संयोजन केले.

# खर्दे येथे भारत संकल्प यात्रा रथाचे स्वागत

**वरुळ । प्रतिनिधी**



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रा. रथाचे ग्रामपंचायत खर्दे या गावी.शिरपूर तालुक्याचे आमदार काशीराम पावरा. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी . जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील. खर्दे ग्रामपंचायत येथील सरपंच काशीराम ओंकार पटेल

नवनिर्वाचित लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत ब्रिजलाल गुजर माजी सरपंच भरत लोटन गुजर साहेब ग्राम विकास अधिकारी नंदराज बैसाणे साहेब यांच्या उपस्थितीमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला नायब तहसीलदार पेंढारकर गट विकास अधिकारी एस टी सोनवणे .बाल विकास प्रकल्प अधिकारी वैशाली निकम सहाय्यक गट विकास अधिकारी सुवर्णा पवार मॅडम विस्ताराधिकारी पवार. मोरे साहेब शिक्षण विस्ताराधिकारी आव्हाड .प्राथमिक आरोग्य केंद्र खर्दे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश निकम .प्रा आ.केंद्राचे सर्व कर्मचारी हेही उपस्थित होते विकसित भारत संकल्प यात्रेचे स्वरूप व विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या भारत संकल्प यात्रा रथाचे आयोजन करण्यात आले आहे. असे आवाहन आमदार काशीराम पावरा यांनी सर्व आलेल्या ग्रामस्थांना पदाधिकाऱ्यांना संबोधन केले व शासनाच्या योजना या जास्तीत जास्त गरजू लाभार्थी पर्यंत कशा पोहोचवल्या जातील याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
सोमवार दि. ११ डिसेंबर २०२३


# रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावरील नावावरुन नाराजी

## धुळ्यात भाजपच्या महापौर व नगरसेवकांमध्ये वाद












धुळे ।
विकसित धुळ्यात महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावर सांगितल्यानुसार नाव घेण्यात आले नाही. फलकावरील नावावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व सत्ताधारी भाजपच्या महापौर व नगरसेवकांमध्ये वाद झाल्याचे बघावयास मिळाले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक कैलास चौधरी यांनी सुचवलेल्या महापालिका रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी फलकावर नाव नसल्याने त्यांनी सत्ताधारी असलेल्या भाजपच्या महापौर प्रतिभा चौधरी यांना जाब विचारला. उद्घाटन फलकावर त्यांचं नाव नसल्यावरून उद्घाटनापूर्वीच उद्घाटनस्थळी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आजी-माजी नगरसेवकांमध्ये व सत्ताधाऱ्यांमध्ये वाद झाल्याचे बघायला मिळाले आहे. कार्यक्रमाचा केला निषेध महापालिकेच्या रुग्णालयाला माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या मातोश्रींचे नाव देण्यात आले असून, या वादामध्ये खासदार सुभाष भामरे यांनी मध्यस्थी करत हा वाद निवळण्याचा प्रयत्न केला आहे. माजी नगरसेवक कैलास चौधरी यांना या कार्यक्रमातून डावलण्यात आल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या कार्यक्रमाचे निमंत्रण देखील त्यांना देण्यात आले नसल्यामुळे या कार्यक्रमाचा निषेध केला आहे. माजी नगरसेवक कैलास चौधरी हे असताना ठराव करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले व सदर काम सुचवले होते,तसा ठराव देखील करण्यात आला होता. परंतु यावेळी सदर उद्घाटन प्रसंगी येथील फलक अनावरण प्रसंगी फलकावर माजी नगरसेवक कैलास चौधरी यांचे नाव नसल्याने कैलास चौधरी यांनी स्वतःच हीच कापण्याचा निर्णय घेतला व सदर बाबतीत निषेध व्यक्त केला.व या उद्घाटन कामास विरोध दर्शवला व नाव नसल्याचा निषेध देखील व्यक्त केला. महापौर,विद्यमान नगरसेवक व कैलास चौधरी यांच्या काही काळ वाद झाला.परंतु सदर धुळे मनपा संचलित असलेल्या या दवाखान्यात स्व.राजमाता श्रीमंत पदमाराजे कदमबांडे रुग्णालय असे नाव देण्यात येत असल्याने माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या आईच्या नाव असल्याने सदर वाद थांबविण्यात आला व सदर फलक हे नव्याने बदलून त्या ठिकाणी कैलास चौधरी यांचे नाव टाकण्यात येईल असे देखील सांगण्यात आले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक



# धुळे जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात संपन्न

## सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवराच्या हस्ते पारितोषिक प्रदान


















धुळे। धुळे

युवकांनी आपले आरोग्य सुदृढ, निरोगी ठेवण्यासाठी आहारात ज्वारी, बाजरी, सावा, नागली अशा पौष्टीक तृणधान्याचा वापर करावा. तसेच तृणधान्य वापर वाढीसाठी युवकांनी जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी केले. जिल्हा क्रीडा कार्यालय, धुळे तसेच जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आज चावरा इंग्लिश मेडीयम स्कुल, धुळे येथे जिल्हास्तर युवा महोत्सव आज उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री.तडवी ते बोलत होते. या महोत्सवाला प्रमुख पाहुणे चावरा इंग्लिश मेडीयम स्कुलचे प्राचार्य सी जीन फादर, तालुका क्रीडा अधिकारी, एम.के.पाटील, क्रीडा अधिकारी रेखा पाटील, कृषि महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.जे.एस.सुर्यवंशी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते विलास कर्डक तसेच चावरा इंग्लिश स्कुलचे शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा अधिकारी श्रीमती पाटील म्हणाल्या की, युवकांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरिता दरवर्षी जिल्हास्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन २०२३-२०२४ या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष २०२३ घोषित केले असल्यामुळे राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्र राज्यासाठी तृणधान्य उत्पादन वाढीसाठी विज्ञानाचा वापर व सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्व या दोन संकल्पना दिल्या आहेत. या संकल्पनेवर आधारीत जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com  RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३६ वा ▶ सोमवार दि.११ डिसेंबर २०२३ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे :६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### खिशातून लांबवली रोकड

**धुळे ।** शहरातील बाजार समितीच्या आवारात अर्जुन भिका जोगी ( वय ४२) यांना काळ्या रंगाच्या वाहनावरून आलेल्या दोघांनी धडक दिली. यात अर्जुन जोगी यांचा तोल गेला. ही संधी हेरून अज्ञात दोघांनी जोगी यांच्या खिशातील ५० हजारांची रोकड घेऊन गर्दीतून पळ काढला, अशी तक्रार अर्जुन जोगी यांनी दिली आहे. आझाद नगर पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस तपास करीत आहेत.

### मालगाडीचे सात डब्बे रुळांवरुन घसरले

**मुंबई ।** मध्य रेल्वेच्या इगतपुरी ते कसारा दरम्यान एका मालगाडीचे सात डब्बे रुळांवरुन घसरले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मुंबईतून बाहेर गावी जाणाऱ्या लांब पल्याच्या मेल-एक्सप्रेस गाड्यांचे वेळापत्रक मात्र कोलमडले आहे. या अपघातानंतर सीएसएमटी-हावडा एक्सप्रेस आणि सीएसएमटी- आदिलाबाद नंदीग्राम एक्स्प्रेससह अनेक मेल-एक्सप्रेस गाड्या खोळंबल्या आहेत. रविवारी संध्याकाळी ६ वाजून ३१ मिनिटांच्या सुमारास इगतपुरी ते कसारा स्थानकांदरम्यान डाऊन मार्गावर एक मालगाडीच्या अपघात घडला आहे.

# छगन भुजबळ यांनी माझा धसका घेतलाय : ते सध्या झोपेतही बरळतात : मनोज जरांगे

### आरक्षण मिळू द्या किती दम आहे ते नंतर बघणारच



### समाजात तेढ निर्माण करण्याचे काम

**मराठा आरक्षणाचे स्वप्न पूर्ण होऊ नये, मराठ्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही, असा त्यांचा डाव आहे. म्हणूनच गैरसमज पसरवून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम काही राजकीय मंडळी करीत असल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे नाव न घेता मनोज जरांगे यांनी केला आहे.**

**मुंबई । प्रतिनिधी**

माझी भाषा मराठवाड्याची आहे, त्यांना नाही समजणार. आरक्षण मिळू द्यायचा नाही हा त्यांचा डाव आहे. तुम्ही सध्या मंत्री आहात, संविधानाची शपथ घेतली आहे, मंत्री पदाचा गैरवापर करू नका, मी रोज काय बोलतो आज काय बोलला, आज काय बोलला याचा धसका घेतला असून सध्या ते झोपेतही बरळत आहे, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. तर आभाळ आले की त्याचे डोके फिरल्यावानी होते असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांना टोला लगावला आहे.

दरम्यान मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, मराठा समाजाच्या जनरेट्यापुढे सरकारने पूर्ण हात टेकले आहेत. स्वातंत्र्याच्या अगोदरच आरक्षण होते सत्तर वर्ष का? दिले नाही.आरक्षण मिळावे, यासाठी मराठा समाजाची झालेली एकजुट काही लोकांच्या मनात खुपत आहे. मराठा आरक्षणाचे स्वप्न पूर्ण होऊ नये, त्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही, असा त्यांचा डाव आहे. त्यासाठी गैरसमज पसरवून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम काही राजकीय मंडळी करीत असल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे नाव न घेता केला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की,देवेंद्र फडणवीसांनी सांगितले असेल की बोल म्हणून. कारण, लोंडा की फोंडा कोण आहे तो वळवळ करत आहे. हे फडणवीसांनीच सुरू करायला लावले आहे. देवेंद्र फडणवीस मराठ्यांच्या अंगावर किती मराठे घालणार आहे बघुयात, मराठा बघतोय. तुमच्या डोक्यात काही विषारी विचार असेल तर मराठा नेत्यांच्या डोक्यात नका ओतू. त्यांच्या माध्यमातून मराठ्यांत कलह लावू नका, असा इशाराही मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे. जर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी समाजाशी दगाफटका करून वेळ मारली तर पुढची वेळ तुम्हाला जड जाईल, आरक्षण मिळावे म्हणून सर्व समाज पाठीशी आहे.एकवेळ आरक्षण मिळू द्या किती दम आहे ते बघतोच असा इशारा त्यांनी दिला आहे.

# राष्ट्रवादी अजित पवार गट व भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये वाद



### रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावरील नावावरून महापौर संतापल्या

**धुळे । प्रतिनिधी**

धुळ्यात महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावर सांगितल्यानुसार नाव घेण्यात आले नाही. फलकावरील नावावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व सत्ताधारी भाजपच्या महापौर व नगरसेवकांमध्ये वाद झाल्याचे बघावयास मिळाले आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक कैलास चौधरी यांनी सुचवलेल्या महापालिका रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी फलकावर नाव नसल्याने त्यांनी सत्ताधारी असलेल्या भाजपच्या महापौर प्रतिभा चौधरी यांना जाब विचारला. उद्घाटन फलकावर त्यांचं नाव नसल्यावरून सत्ताधाऱ्यांमध्ये वाद झाल्याचे बघायला मिळाले आहे. कार्यक्रमाचा केला निषेध माजी नगरसेवक कैलास चौधरी यांना या कार्यक्रमातून डावलण्यात आल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या कार्यक्रमाचे निमंत्रण देखील त्यांना देण्यात आले नसल्यामुळे या कार्यक्रमाचा निषेध केला आहे.

## सोलापुरात राऊतांच्या कारवर चप्पलफेक




**सोलापूर ।** सोलापूरात एका हॉटेलच्या उद्घाटनासाठी गेलेले ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांच्या गाडीवर चप्पलफेक करण्यात आली. त्यानंतर घटनास्थळावर चांगलाच गोंधळ उडाला. तर अज्ञातांकडून ही चप्पलफेक केल्यानंतर 'नारायण राणे जिंदाबाद' अशा घोषणा देत घटनास्थळावरुन पळ काढला. संजय राऊत हे आज सोलापूर दौऱ्यावर आहेत. आज दिवसभर त्यांनी सोलापुरात विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. शिवसैनिकांशी संवाद साधला. मीडियाशीही संवाद साधला. संध्याकाळी त्यांचा मुख्य आणि महत्त्वाचा कार्यक्रम होता. राऊत यांच्या हस्ते हॉटेलचं उद्घाटन करण्यात येणार होतं. त्यामुळे राऊत थांबले होते. संध्याकाळी ते कार्यक्रम स्थळी आले. राऊत यांच्या हस्ते हॉटेलचं उद्घाटनही करण्यात आलं. त्यानंतर राऊत यांचे भाषणही झाले.

# धावत्या शिवशाही बसला भीषण आग

### सर्व प्रवाशी सुखरूप; अनर्थ टळला

**नाशिक । प्रतिनिधी**



निफाड तालुक्यातील चांदोरी नजीक असणाऱ्या शिंपी टाकळी फाटा येथे नाशिक ते छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर आज (दि.१०) रोजी दुपारच्या सुमारास धावत्या शिवशाही बसला भीषण आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नसून सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवशाही बस क्रमांक (एम.एच ०९, एफ एल ०४७७) ही बस नाशिकहून छत्रपती संभाजी नगरकडे जात होती. यावेळी बसमध्ये इंजिनच्या बाजूने दूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्यावेळी चालकाने तात्काळ बस थांबून सतर्कतेने बसमधील २० हून अधिक प्रवाशांना सुखरूप खाली उतरवले. त्यानंतर काही क्षणातच बसने मोठ्या स्वरूपात पेट घेतला. दरम्यान, या घटनेमुळे नाशिक ते छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर काहीकाळ वाहतूक ठप्प झाली होती. तसेच सदर आगीत संपूर्ण बस भक्षस्थानी पडली होती. यानंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

# चिमठाणे धुळे महामार्गावर अपघात

**चिमठाणे ।** धुळे व नंदुरबार महामार्गावर शहादा कडुन नाशिक कडे जाताना बाबूने भरलेली पिकअप व बसमध्ये अपघात घडला. त्यात बस मध्ये ५२ ते ५५ प्रवासी बसलेले असतांना हा अपघात झाला.सविस्तर माहिती अशी की एम एच .१८ .अ .अ.२८७३ चालक निलेश भटू पाटील रा फागणे यांची पिकअप वाहन धुळे कडुन दोंडाईचा कडे जात होते. त्यात टोकदार बांबूच्या गाडीचा ओव्हर लोड असल्याने पिकअप गाडी स्पिडने असल्याने पिक अप गाडी ने बसला कट मारल्या मुळे बसच्या आजूबाजूच्या काचेच्या खिडक्या फुटल्या व अनेक ठिकाणी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शहादा आगार बसच्या वाहक चालक यांनी प्रवासीना सुखरूप बाहेर काढून दुसऱ्या बसने रवाना केले.

# चांदवडच्या आंदोलनात शरद पवार उतरणार

**नाशिक । प्रतिनिधी**



केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. कांद्याचे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारनं निर्यात बंदी करण्याचा निर्णय घेतलाय. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी राहणार असल्याचे परिपत्रक सरकारकडून काढण्यात आलं आहे. मात्र, या निर्णयाच्या विरोधात राज्यातील वातावरण चांगलच तापलं आहे. ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलनं सुरु केली आहेत. अशातच आता कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार मैदानात उतरले आहेत. कांदा निर्यातबंदीच्या विरोधात येत्या सोमवारी ११ डिसेंबरला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर नाशिक जिल्ह्यातील चांदवडलाआंदोलन होणार आहे. या आंदोलनाला खुद्द शरद पवार उपस्थित राहणार आहेत. कांदा निर्यातबंदीवर केंद्र सरकारला जाग आणण्यासाठी खासदार शरद पवार हे आता मैदानात उतरले आहेत. ११ डिसेंबरला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चांदवडला शेतकऱ्यांचा एल्गार होणार आहे. मुंबई-आग्रा रोड चांदवड चौफुली येथे हे शेतकरी आंदोलन होणार आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार स्वतः आंदोलनात सहभागी होणार आहेत. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना सहभागी होण्याचं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीनं करण्यात आलं आहे. दरम्यान, कांद्यावर निर्यातबंदी घातल्यानं शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे.केंद्र शासनाकडून ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. कांद्याच्या वाढत्या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र शासनाने निर्यात बंदीचा घेतला निर्णय घेतला आहे.

# भारत आदिवासी पार्टीची पक्ष मजबूतीकरण बैठक



**धुळे । प्रतिनिधी**

भारत आदिवासी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जितेंद्र असलकर हे रविवार दिनांक १० डिसेंबर रोजी धुळे जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली गुलमोहर शासकीय विश्रामगृह येथे पक्ष मजबुतीकरण बैठक घेण्यात आली.

मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीतही एक आमदार निवडून आणत पार्टीने आपले खाते उघडले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीतही महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये भारत आदिवासी पार्टीतर्फे उमेदवार दिले जातील. त्या अनुषंगानेच पक्ष मजबुतीकरणासाठी ठिकठिकाणी बैठकांचे आयोजन केले जात असल्याची माहितीही असलकर यांनी बैठकीत दिली. या बैठकीला भारत आदिवासी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आबा अहिरे, आदिवासी एकता परिषदेचे सचिव सुनील गायकवाड, आदिवासी टायगर सेनेचे पंढरीनाथ मोरे, जिल्हाध्यक्ष वल्लभ मालचे, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र माळी, दिनेश पिपळसे, किशोर ठाकरे, प्रवीण मोरे, तसेच अनेक आदिवासी संघटनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून आपली मते मांडली.

# थाळनेर येथे तलाठीवर हल्ला

**धुळे ।** शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथे तलाठी नवनीत खंडेराव पाटील (वय ३५) यांच्यावर सोनू आनंदसिंग जमादार तसेच अज्ञात एक व्यक्तीने दमदाटी करत हल्ला केला. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आला. थाळनेर पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला आहे.

# धुळे तालुक्यात ३० तलाठी व १० मंडळ कार्यालये मंजुर

### आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने धुळे तालुक्यात ३० तलाठी कार्यालय इमारत आणि १० मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारत बांधकामांना मंजुरी मिळाली आहे. या कामासाठी एकूण ६ कोटी ७५ लक्ष रुपये मंजुर करण्यात आले असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले. मंडळ कार्यालय आणि तलाठी कार्यालय इमारतींच्या बांधकामांमुळे धुळे तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेची गैरसोय दूर होणार आहे.

तलाठी कार्यालय बांधकामासाठी ४ कोटी ७५ लक्ष रुपये तर मंडळ कार्यालयासाठी १ कोटी ८० लक्ष रुपये मंजुर करण्यात आले असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.

### या गावांचा समावेश



**आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने मंजुर करण्यात आलेल्या तलाठी कार्यालय इमारत बांधकामासाठी. त्यात खेडे, वार, निमडाळे, अकलाड, पाडळदे, मेहरगाव, भदाणे, रामी,बोरीस, धनुर,बिलाडी,जापी, न्याहळोद, विश्वनाथ, वणी बु., आंबोडे, वेल्हाणे, जुनवणे,नंदाळे बु.,हेंद्रण, तरवाडे, मोघण, पुरमेपाडा, धाडरे, रानमळा, धुळे शहर, महिंदळे, अवधान,रावेर, वरखेडे या गावांचा समावेश आहे. तसेच मंडळ कार्यालय इमारत बांधकामासाठी धुळे ग्रामीण, नेर,कुसूंबा, फागणे,धुळे शहर, सोनगीर, लामकानी, शिरुड, आर्वी,मुकटी या गावांचा समावेश आहे.**

# बुधबाजारात व्यवसाय थाटल्यास साहित्य जप्त; बुधवारपासून कारवाई

**धुळे ।** शहरातील देवपूर बसस्थानकाजवळ बुधबाजार भरविला जातो. यामुळे रहदारीचा रस्ता बंद होऊन नागरिकांची गैरसोय होते. त्यामुळे येत्या बुधवारपासून तेथे कोणताही व्यवसाय करू नये अन्यथा संबंधित विक्रेत्यांच्या वस्तू, साहित्य महापालिका अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून जप्त केले जाईल, असा इशारा महापालिकेतर्फे देण्यात आला आहे. शहरातील देवपूर बसस्थानकाजवळ दर बुधवारी बाजार भरविला जातो. बुधबाजार या नावाने हा बाजार प्रसिद्ध आहे. या बुधबाजारात मोठ्या प्रमाणावर छोटे विक्रेते मोकळ्या जागेत तसेच रस्त्यावर दुकाने थाटतात. ग्राहकांचीही मोठी गर्दी या बाजारात खरेदीसाठी उसळते. त्यामुळे या भागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते.

# जनावरांच्या पोटात जात आहेत प्लास्टिक पिशव्या

कचराकुंड्यात आढळून येणारं खराब अन्न, प्लास्टिक पिशव्या आणि कचऱ्यामुळे जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. कचराकुंडीतील अन्न खाताना जनावरांच्या पोटात प्लास्टिक पिशव्या जात असून, तोंडात (जबड्यात) पत्र्याचे डब्बे अडकून राहत असल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागात सर्रास दिसून येते.

सध्या शहराचा विस्तार झपाट्याने वाढत असून, जागोजागी इमारती, घरे, बंगले, सोसायटी, नागरी वसाहती, टपऱ्या, दुकाने, हॉटेल वाढलेले आहे. या माध्यमातून कचरादेखील वाढलेला असून, हॉटेलचे खराब अन्न, भाजीपाला, कचरा, विनावापराच्या विविध वस्तू कचराकुंड्यासह कुठेही फेकून दिल्या जातात. काही मूळ मालकांनी त्यांची जनावरे मोकाट सोडलेली आहेत तसेच जनावरांच्या जीवावर काहीजण धंदा करीत असून, त्यांची अनेक जनावरे विविध रस्त्यांवर मोकाट फिरत असतात. त्यांचे जनावरांच्या खाण्या-पिण्याकडे लक्ष नसते. भूक लागल्यावर बहुतांश जनावरे थेट कचराकुंड्यावर दाखल होतात. येथील अन्न खाताना प्लास्टिक पिशव्या, दूध पावडरचे रिकामे पत्र्याचे डब्बे, तारा, वायर, काचा, खिळे, लोखंडी व प्लास्टिक तुकडे अशा विविध वस्तूंपासून जनावरांना धोका असतो. बऱ्याच जनावरांच्या पोटात प्लास्टिक व तोंडात पत्र्याचे डब्बे अडकून बसतात. याकडे कोणाचे लक्ष गेले तरच डब्बा अडकल्याचे लक्षात येते. अन्यथा जनावराला त्रास सहन करावा लागतो. गाय, बैलांच्या तोंडातून डब्बे काढणे मुश्कील काम असते. संबंधित जनावरांना बेशुद्ध करावे लागते. बऱ्याचदा या कामासाठी रेस्क्यू पथकाला बोलवावे लागते तसेच काही सामाजिक कार्यकर्ते व जनावरांचे डॉक्टर या कामासाठी नेहमी प्रयत्न करतात. याबाबत यश न आल्यास जनावरांचे जीव गेले आहेत.

ग्रामीण भाग असो, की शहरी भाग. अन्न शोधण्यासाठी गायी, म्हशी, अन्य पाळीव प्राणी रस्त्याने दिवसभर हिंडतात. रस्त्याच्या बाजूला वर्षानुवर्षे कचरा साठलेला असतो. हा कचरा वेळेवर हटविला जात नाही. या कचऱ्यात प्लास्टिकचे प्रमाण प्रचंड असते.




### अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही

**दिवसभर खाल्लेला कचरा हळूहळू पोटात जमा होतो. हा कचरा पचत नाही. गायी, म्हशींत प्लास्टिक कचरा साठल्यामुळे दुधाचे प्रमाण कमी होते. एके दिवशी ही गाय तडफडून मरून जाते. न्यायालयाने याबाबत स्थानिक प्रशासनाला प्लास्टिक कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट करण्यासाठी आदेशही दिले आहेत; पण या आदेशाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. कचराकुंडीतील ९९ टक्के कचरा हा प्लास्टिकचाच असतो, हे वास्तव आहे.**



### प्लास्टिक कसे तयार होते?

**पॉलिथीननिलनपासून प्लास्टिक बॅगची निर्मिती होते. हे पॉलिइथिलिन नैसर्गिक वायूमधून खास प्रक्रिया करून मिळविले जाते. पॉलिमरमध्ये कार्बन आणि हायड्रोजनची प्रचंड मोठी शृंखला असते. उच्च घनता असलेले पॉलिइथिलिन, पॉलिव्हायनील क्लोराईड, कमी घनता असलेले पॉलिइथिलिन, पॉलिप्रॉपीलिन, पॉलिस्टायरिनही असते.**

# भ्रष्टाचारमुक्त भारताची 'मोदी की गॅरंटी'- केशव उपाध्ये

**नाशिक । प्रतिनिधी**



झारखंडमधील काँग्रेस खासदाराकडील २०० कोटींचे घबाड हे तर काँग्रेसच्या भ्रष्टाचाराचे हिमनगाचे टोक आहे. भ्रष्टाचारमुक्त भारताची 'मोदी की गॅरंटी' असल्याचे प्रतिपादन भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटले. यावेळी प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदेश प्रवक्ते पंकज गांधी, नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, आ.सीमा हिरे, सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, उपस्थित होते.

भ्रष्टाचार, कमिशनखोरी, लुबाडणूक, दलाली आणि लाचखोरी याच इतिहासाने बरबरटेल्या काँग्रेसचा आणखी एक भ्रष्ट चेहरा झारखंडमध्ये उजेडात आला आहे. या राज्यात काँग्रेसचे राज्यसभा सदस्य धीरज साहू यांच्या घरात सुमारे नऊ कपाटांमध्ये खचाखच भरलेली दोनशे कोटींहून अधिक रकमेची रोकड जप्त करण्यात आली आहे. काळा पैसा आणि भ्रष्टाचार नष्ट करण्याच्या पंतप्रधान मोदी यांच्या मोहिमेतून आता काँग्रेसचा कारभार उघडकीस येऊ लागला असून जिथे काँग्रेस तिथे भ्रष्टाचार हे समीकरण झाले आहे. तर भ्रष्टाचार निपटून काढणे ही 'मोदी की गॅरंटी' असल्याचे स्पष्ट झाले आहे, असा घणाघाती दावा भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केला. भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. झारखंडमध्ये काँग्रेसच्या एका संसद सदस्याच्या घरात ही कोट्यवधींची रोकड सापडली, तर या हिशेबाने काँग्रेसच्या अन्य नेत्यांच्या घरी आणि काँग्रेसचे सर्वे सर्वा असलेल्या गांधी कुटुंबाकडे किती संपत्ती असेल? याचा हिशेब जनतेने करावा असेही ते म्हणाले. या हिशेबानुसार, गांधी परिवार हा जगातील सर्वात भ्रष्ट परिवार ठरेल, असा आरोपही त्यांनी केला.

CMYK



## काँग्रेसला मिरची लागली

सारा गांधी-नेहरू परिवार काँग्रेसचे दैवत आहे. त्यांच्याविषयी काहीही वास्तव बोलले तरी काँग्रेसला ते सहन होत नाही. जणू काही आकाशातून पडलेली ही दैवते आहेत व त्यांनी केलेले सर्व काही शंभर टक्के योग्य होते अशी काँग्रेसजनांची समजूत आहे. अशा भ्रामक समजुतीत सतत वावरल्यामुळेच काँग्रेसची जनतेशी नाळ तुटली आहे व त्याचा फटका वेळोवेळी निवडणुकीत पक्षाला बसतो आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत जम्मू-काश्मीर सुधारणा विधेयक २०२३ मांडताना काश्मीर समस्या पं. नेहरूंमुळे निर्माण झाली, पंडित नेहरूंमुळेच पाकिस्तानव्याप्त काश्मीर निर्माण झाला असे वास्तव सांगितले. अमित शहा यांचे वक्तव्य ऐकून काँग्रेसचे खासदार भडकले, त्यांच्या दैवतावर सरकारने हल्ला केला म्हणून ते डिवचले गेले. पण पंडित नेहरूंनी केलेली चूक कधीच कोणी सांगायची नाही का?

देशाला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्षे झाली. स्वातंत्र्याचा अमृत काळ म्हणून सर्वत्र उल्लेख केला जात आहे. पण पाकिस्तानव्याप्त काश्मीर आजही भारताच्या बाहेर व पाकिस्तानच्या कब्जात आहे हे मोठे दुर्दैव आहे. पं. नेहरूंनी केलेल्या मोठ्या चुकीमुळे हे सारे घडले आहे, असे अमित शहा यांनी सांगितले, तर काँग्रेसच्या खासदारांनी थयथयाट कशाला करायचा? जे सत्य आहे ते देशाच्या संसदीय लोकशाहीच्या सर्वोच्च व्यासपीठावर अमित शहा यांनी सांगितले. देशावर काँग्रेसने सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली मग संयुक्त राष्ट्र संघात काश्मीर प्रश्न का सोडवता आला नाही? पाकिस्तानव्याप्त काश्मीरला भारतात का आणता आले नाही? पाकिस्तानव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे ही भारताची भूमिका सातत्याने राहिली आहे. जे काँग्रेसला जमले नाही ते भारतीय जनता पक्ष करून दाखविणार यावर जनतेचा विश्वास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच काश्मीरची समस्या सोडवतील असे प्रत्येक भारतीयाला वाटते आहे. जी चूक पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली ती दुरुस्त करण्याचे काम मोदी- शहा हेच करू शकतील, असा जनतेला विश्वास वाटतो.

अमित शहा यांनी संसदेत मांडलेले जम्मू-काश्मीर सुधारणा विधेयक २०२३ हे गेली सत्तर वर्षांपासून जे अपमानीत राहिले, अन्याय सहन करीत राहिले व दुर्लक्षित राहिले, त्यांना न्याय देणारे विधेयक आहे असे स्वत: केंद्रीय गृहमंत्र्यांनी विधेयक मांडताना सांगितले आहे. सुधारित विधेयकानुसार जम्मूमध्ये पूर्वी विधानसभेच्या ३७ जागा होत्या, त्या आता ४३ होतील, काश्मीरमध्ये विधानसभेच्या ४६ जागा होत्या त्या आता ४७ होतील. जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील २४ जागा राखीव आहेत कारण तो भारताचाच प्रदेश आहे, ही आपल्या देशाची भूमिका आहे. त्याशिवाय नामनियुक्त सदस्यांच्या संख्येतही वाढ करण्यात आली आहे, पूर्वी नामनियुक्तांची संख्या ४ होती आती ती ५ करण्यात आली आहे. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधूनही एक नामनियुक्त सदस्य विधानसभेवर घेण्याची तरतूद सुधारित विधेयकात आहे. जम्मू-काश्मीरला घटनेतील ३७० व ३५ (अ) कलमाचे सुरक्षा कवच गेल्या सत्तर वर्षांपासून होते. या राज्याला त्यामुळे विशेषाधिकार प्राप्त झाले होते. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने जम्मू-काश्मीर राज्याला विशेषाधिकार देणारे ३७० व ३५ (अ) कलम रद्द केले तेव्हा काँग्रेसने तसेच त्या राज्यातील फारूख अब्दुल्ला तसेच मेहबुबा सईद यांच्या पक्षाने तसेच देशातील भाजपा विरोधकांनी गळे काढले होते. दिवसाढवळ्या पंडितांच्या घरात घुसून दहशतवादी रक्तांचे सडे शिंपत होते. तेव्हा जे गप्प बसले होते ते आज अमित शहांच्या भाषणावर संताप प्रकट करताना दिसले. काँग्रेसच्या काळात काश्मीरमध्ये दहशतवाद फोफावला. त्या काळात चार लाख पंडितांना आपली घरे-दारे सोडून अंगावरच्या वस्त्रानिशी बायका-मुलांसह खोऱ्यातून पळ काढावा लागला होता. खोऱ्यातून तातडीने निघून जा, अशा धमक्या उघडपणे लाऊडस्पिकरवरून दिल्या जात होत्या. तेव्हा ३७० व्या कलमाचे प्रेमी कुठे लपून बसले होते? मोदी सरकारने ३७० वे कलम रद्द केल्यापासून दहशतवादाच्या घटनांमध्ये मोठी घट झाली आहे. एन्कौन्टरचे प्रमाणही घटले आहे. मोदी सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये साडेसात लाख रोजगार उपलब्ध करून दिले. तेथील विकासकामांनाही वेग आला आहे. पण नेहरूंमुळे काश्मीर समस्या निर्माण झाली हे सत्य सरकारने सांगताच काँग्रेसला मिरची लागली.

## तेलंगणा, छत्तीसगडमध्ये सत्तांतर का?

छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये अनेक कल्पक योजना राबवल्या गेल्या. तेथील प्रशासनही ठिकठाक भासत होते. तरीही जनतेने येथील राजवट उलथवून टाकली. मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील निकालांकडे अधिक लक्ष गेल्याने या राज्यांमधील लक्षवेधी राजकीय गणित फारसे पुढे आले नाही. मात्र या दोन राज्यांतील सत्ताधारी पक्ष पराभूत होण्यामागील काहीशी समान परिस्थिती भारतीय मतदारांच्या मनोभूमिकेवर भाष्य करणारी आहे. ताज्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला अन्य कोणतेही राज्य खात्रीशीरपणे मिळेल, असे वाटत नव्हते; परंतु छत्तीसगडमध्ये ७५ जागा मिळवून सत्तेवर येण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला होता.

विविध पाहण्यांमध्ये आणि मतदानोत्तर चाचण्यांमध्येही भाजपा कडवी लढत देईल; परंतु सत्ता काँग्रेसची येईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता; परंतु काँग्रेसचा पराभव झाला. परिस्थिती २००३ सारखी झाली. धर्मनिरपेक्षतेच्या मुद्द्यावर निवडून आलेल्या काँग्रेसने नंतर भाजपच्या वाटेने जाऊन आपली ओळख पुसली. मुळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाचा अजेंडा असलेला रामवन गमन मार्ग तयार करण्यात काँग्रेस सरकार व्यस्त राहिले. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी प्रभू रामाच्या आई कौसल्या यांच्या नावाने बांधलेल्या मंदिराचे सुशोभीकरण आणि प्रसिद्धी करण्याची एकही संधी सोडली नाही. ठिकठिकाणी प्रभू रामाच्या महाकाय पुतळ्यांची प्रतिष्ठापना ही सरकारची प्राथमिकता आहे, असे त्यांना वाटत



होते. एकीकडे काँग्रेसचे सरकार आदिवासींच्या श्रद्धेची प्रतीके हिंदू देवतांशी जोडत राहिले, तर दुसरीकडे आदिवासींच्या विरोधाला न जुमानता आंतरराष्ट्रीय रामायण महोत्सव, गावागावात मानस स्पर्धा असे कार्यक्रम राज्यभर सुरू राहिले.

भारताला हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी काँग्रेस नेत्यांच्या आश्रयाने आयोजित केलेल्या चर्चासत्रांची देशभर चर्चा झाली. त्याचप्रमाणे ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या आदिवासींवरील हल्ले, त्यांचे मृतदेह उकरून टाकणे आणि धार्मिक स्थळांची तोडफोड करणे या घटना काँग्रेस सरकारच्या काळात घडल्या. अशा अनेक घडामोडींमुळे हक्काचा मतदार काँग्रेसपासून दुरावला आणि ताजा निकाल समोर आला. तेलंगणामध्येही असेच काही घडले आणि भारत राष्ट्र समितीला पराभवाला सामोरे जावे लागले. उत्तराखंडमधील काँग्रेसचा पराभव बरेच काही सांगून जाणारा आहे. इथे जातीय दंगलीमध्ये मारल्या गेलेल्या हिंदूंच्या नातेवाइकांना नुकसानभरपाई आणि नोकऱ्या देण्यात आल्या. उलट, अशाच हिंसाचारात मारल्या गेलेल्या मुस्लिमांकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे चार टक्के अल्पसंख्याक समाज काँग्रेसवर नाराज झाला. हिंदुत्वाचे जे मैदान काँग्रेसने तयार केले, तेच मैदान भाजपाने काबीज करून विधानसभा निवडणुकीत विजय नोंदवला.

देशातील सर्वाधिक ३२०० रुपये प्रति क्विंटल दराने धान खरेदी, शेतकऱ्यांची कर्जमाफी, बचत गटांची कर्जमाफी, केजी ते पीजीपर्यंत मोफत शिक्षण अशा अनेक घोषणा या राज्यात काँग्रेसच्या भूपेश बघेल सरकारने केल्या. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने दारूबंदी, नक्षलवादावर शांततापूर्ण चर्चा, हसदेव येथील खाणी बंद करणे, बेरोजगार आणि महिलांना रोख रक्कम अशी आश्वासने दिली होती. त्यातील काहींची पूर्तता सरकारने केली नाही. कर्जमाफी आणि धान खरेदीमुळे सरकारची लोकप्रियता वाढली. याशिवाय २०० युनिटपर्यंतचे वीजबिल निम्मे करण्याचे आश्वासनही काँग्रेसने पूर्ण केले होते. अशा परिस्थितीत इतक्या फायद्याच्या योजना जाहीर करूनही जनतेने ताज्या निवडणुकीत काँग्रेसला का नाकारले, असा प्रश्न पडतो. काँग्रेसच्या अहंकार आणि फाजील आत्मविश्वासामुळे या पक्षाला जनतेने जागा दाखवून दिली. मधल्या काळात पक्ष आणि सरकार तसेच नेते आणि जनता यांच्यातली नाळ तुटली. भूपेश बघेल यांनी पाच वर्षे मुख्यमंत्री असताना पक्षात मोठ्या प्रमाणात गटबाजी केली. मंत्र्यांचे पंख छाटले. आमदारांची कामे झाली नाहीत. आमदारांच्या विरोधात नाराजी वाढली.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेसने २० आमदारांची तिकिटे कापली. दर चार-पाच महिन्यांनी आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. जणू काही बदली हाच इथला उद्योग आहे, असे चित्र होते. गेल्या पाच वर्षांमध्ये कोळसा घोटाळा, दारू घोटाळा, 'डीएमएफ' घोटाळा, 'ईडी' आणि प्राप्तिकर खात्याचे छापे, या आरोपांवरून मुख्यमंत्र्यांच्या जवळच्या अधिकाऱ्यांना तुरुंगात पाठवणे या मुद्द्यांचाही परिणाम झाला. बहुतांश सरकारी खात्यांमध्ये सर्रास भ्रष्टाचार घडत होता. काँग्रेसकडे बस्तर आणि सुरगुजामधील सर्व जागा होत्या; मात्र या पाच वर्षांमध्ये हसदेव ते सिल्गरपर्यंत दोन डझनहून अधिक ठिकाणी आदिवासींची आंदोलने सुरू राहिली आणि वर्षानुवर्षे सुरू असलेल्या या आंदोलनांकडे सरकारने दुर्लक्ष केलेच; पण काही भागांत या चळवळी दडपल्याही गेल्या. बस्तरमधील बनावट चकमकींच्या न्यायालयीन चौकशीवर कारवाई करण्याऐवजी सरकारने ती रोखून धरली. सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री वास्तवापासून दूर जाऊ लागले. सरकार आणि काँग्रेस पक्षाला जनआंदोलनांपासून दूर ठेवलेच; पण जनआंदोलनांतल्या नेत्यांच्या विरोधात अपमानास्पद वक्तव्य करण्याची एकही संधी मुख्यमंत्र्यांनी सोडली नाही. काँग्रेसचे तळागाळातील कार्यकर्तेही दुर्लक्षित झाले. याशिवाय पक्षातील गटबाजीवर नियंत्रण आणि मुख्यमंत्रीबदलाचा शब्द पाळण्यात काँग्रेस श्रेष्ठींना अपयश आले.

काहीसा असाच प्रकार तेलंगणामध्ये घडला. तिथे जनतेसाठी विविधांगी योजना राबवूनही के. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. 'आयडेंटिटी क्रायसीस' हा तिथला महत्त्वाचा मुद्दा ठरला. दक्षिणेकडील राज्यात प्रादेशिक अस्मिता कायम महत्त्वाची असते. 'तेलंगणा राष्ट्र समिती' हे राव यांच्या पक्षाचे नाव प्रादेशिक होते. ते बदलून 'भारत राष्ट्र समिती' करणे जनतेला फारसे रुचले नाही. नवीन पटनायक यांच्याप्रमाणे भाजपा आणि काँग्रेसला समान अंतरावर ठेवण्याचा राव यांचा आधी प्रयत्न होता. त्यांना तिसऱ्या आघाडीचे स्वप्न पडत होते. अखिलेश यादव, उद्धव ठाकरे, ममता बॅनर्जी आदी नेत्यांशी चर्चा करून देशाचे नेते बनण्याचे स्वप्न पाहताना त्यांना आपल्या पायाखालचे जाजम कुणी तरी काढून घेत आहे, याची जाणीवच झाली नाही. त्यातच पक्षवाढीसाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये शिरकाव केला. त्यासाठी बराच पैसा ओतला. तेलंगणामध्ये नाराजी वाढत असताना, मतदारांना हा कथित विस्तार पसंत नसताना राव मतदारांपासून दूर जात राहिले.

**क्रमश:**

## लोकरकाम हस्तकला व विणकाम व्यवसायाला सरकारी सहाकार्य अभावी घरघर

### आरोग्यदायी लोकरी वस्तु व्यवसाय लयास !

आजच्या मानवी युगात मानवाला अनेको शारीरिक व्याधींसोबत जगावे लागत आहे. अनेको आजार शरीराला त्रासदायक ठरणारे निर्माण झालेले आहेत.. अगदी कमी वयातच लोकांना सांधेदुखी, अंगदुखी, स्नायुंची व्याधी जडलेली आहे. त्यासाठी अनेक लोक रुग्णालये किंवा इतर घातक औषधांचा वापर करुन स्वत:चा पैसा आणि आरोग्य धोक्यात घालत आहेत. परंतु मेंढीच्या लोकरीपासुन तयार झालेली कांबडे(घोंगडी), जीन, लोकरीगादी, लोकरी आसनपट्टी हे अतिशय आरोग्यदायी आहेत. घोंगडीने थंडीपासुन बचाव तर होतोच परंतु माणसाला झालेले पित्त या व्याधीला दुर करण्यासाठी त्वचारोग दुर करण्यासाठी, खाज व्याधी संपविण्यासाठी लोकरी घोंगडी अतिशय उपयुक्त आहे. लोकरी जीन ८ रुंद आकाराची गादी सांस्कृतिक पुजेला घोंगडी गरजेची हे संधीवात आणि हाडांच्या दुखण्यावर अतिशय उपयोगी ठरतात. स्नायुंचे दुखणे,



संधीवात ज्या माणसाला असेल त्याच्यासाठी जीनवर झोपणे अतिशय उपयोगी आहे. लोकरी गादी ही सुद्धा माणसाचा चांगला रक्तपुरवठा, त्वचेचे आजार, ह्दयरोग, स्नायुदुखी इ. व्याधींवर उपयोगी ठरते. लोकरी आसनपट्टी ही योगासने अथवा नेहमी बसण्यासाठी आरोग्यदायी ठरते. परंतु आज लोकरकाम, हस्तकला व विणकाम व्यवसायाला घरघर लागली आहे. त्याचे कारण या व्यवसायाला कोणतेही शासकीय अनुदान किंवा कोणतीही योजना नाही दुसऱ्या व्यवसायापेक्षा या व्यवसायात मेहनत जास्त परंतु आर्थिक उत्पन्न कमी प्राप्त होत आहे. त्यामुळे आजच्या घडीला या व्यवसायासाठी व्यवसाय करणारा धनगर बांधव तयार नाही.

हा आरोग्यदायी व्यवसाय आणि विशेष हस्त कला टिकविण्यासाठी शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यास व्यवसाय नव्याने उदयास येवुन या व्यवसायातुन समाजाचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.

माझ्या आजोबांपासुन हा लोकरकाम व विणकाम व्यवसाय आम्ही आजही करत आहोत. घोंगडी, जीन इ. तयार करण्यासाठी मोठी मेहनत व वेळ लागत असते. त्यामुळे हा व्यवसाय आर्थिक दृष्ट्या पुरवडणारा नसुन जर शासनाने काही अनुदान सबसिडी, साहित्य, बँकेचे कर्ज मिळाल्यास या व्यवसायाला नवे दिवस येतील तथा या वस्तु समाजोपयोगी ठरतील.




निलेश बुधा आढावे
मो.९१५८९३०७६७

खादी उद्योग प्रमाणे लोकर उद्योगापासुन तयार झालेल्या वस्तुंना शासनाने जर स्टॉल, दुकाने किंवा इतर योजनेतुन विक्री केल्यास या व्यवसायाला खादी उद्योग प्रमाणे चालना मिळेल. दिवसेंदिवस हा व्यवसाय करण्यासाठी धनगर बांधव आर्थिक दृष्ट्या पुरवडत नसल्याने नाकारत आहे. परंतु शासनाने विविध विशेष योजना राबवुन लोकरकाम, विणकाम उद्योगाला महत्व प्राप्त झाले पाहिजे. या व्यवसायाला प्रशासनाने देखील आर्थिक मदत केली पाहिजे अशी देखील मागणी होत आहे.

**व्यवसाय पार्श्वभुमी**

१. मागील १०० वर्षापासुन हा व्यवसाय सुरु.
२. धनगर समाज हा मेंढीपालन करणारा प्रमुख समाज.
३. पुर्वी धनगर समाजाच्या घराघरात लोकरकाम, विणकाम हा व्यवसाय केला जायचा
४. कालानुरुप व्यवसाय किंवा लोकरी वस्तुंचे उत्पादन घटेल.
५. आजच्याघडीला लोकरकाम व विणकाम व्यवसाय करणारे आर्थिकदृष्टया पुरवडत नसल्याने संख्या कमी झाली.
६. शासकीय सहाकार्याची अपेक्षा व्यवसाय करणाऱ्यांची आहे.

### शब्दकोडे-२५८



**आडवे शब्द**

१. कृष्णाचा मित्र ६. जवळपास, सभोवती ९. ढीग ११. प्रत्येक वर्षी १३. रस्ता १४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर १६. दृष्टिभेट १९. पूर्ण भरतीची वेळ २०. नवा २२. पृथ्वी २३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे २६. प्रत्येक दिवशी, मजुरी २७. जास्त २९. लता, वेल ३०. टिंगल ३१. बोटाच्या टोकावर असते ते ३२. खरेदी ३४. जुने, ऐतिहासिक लेखन ३६. वटवट ३८. जबरदस्तीने (हिंदी) ४०. चेहऱ्याची निमुळती बाजू ४२. ज्वारीची रोटी ४४. माल ४५. हिंदीत कालवा ४६. भाकरी-पोळीचा पाव भाग ४८. अपऱ्या नाकाची ५०. बांबू ५२. आंब्याची पोळी ५४. मांडणी ५६. हिशोबात केलेला गोंधळ ५७. चक्र ५८. रामाचा एक भाऊ ५९. वजनदार ६०. व्यापारी ६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव ६२. अनुकंपा, करूणा ६३. स्तुतीस्तोत्र ६५. भांडण ६७. मागचे अंगण ६९. प्रत्यक्षात ७१. आशीर्वाद, वर ७३. परंपरागत गण वा संपत्ती ७४. शेत ७५. कावळा ७६. जनन ७७. बळी जाणारा ७८. काळ्या पाठीचे हरीण ७९. उत्तराधिकारी ८०. ताक कांुफ्कून पिणारा ८१. मल्याळी भाषिक राज्य

**उभे शब्द**

१. श्रीकृष्णाचे आयुध २. दरवाजा ३. मत्स्य ४. आटोपते घेणे, आवरणे ५. जोरजबरदस्ती ६. कुंभाराची भट्टी, स्त्री ७. काचेचे पात्र ८. मध्यम प्रमाण ९. कृष्णसखी १०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक १२. नम्र १५. शिल्लक १७. असे असल्यास १८. धूळ २१. फायदा २४. नाजूकपणा नसलेले, भडक २५. प्रौढ, जून २६. थेट, स्पष्ट २८. ताणले जाणारे ३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख ३५. खणणे ३७. माळी, बागवान ४०. अडथळा, प्रश्न ४१. दरारा ४२. नशीब ४३. घोड्यावरून फेरी ४७. काटेरी औषधी वनस्पती ४९. अगदी थोडे ५१. नम्रपणे झुकलेला ५२. उंट हाकणारा ५३. अकस्मात ५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ५६. महासर्प ५९. संधी ६१. नगर ६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा ६४. सततची हालचाल ६६. पटकन ६८. रामदासांचा ग्रंथ ६९. बैलांचा सण, बेंदूर ७०. दरवाज्यावरचा आवाज ७२. दृष्टी ७४. माठ, गाडगे ७५. कारस्थान ७८. मृत्यू

### शब्दकोडे-२५७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.पंतप्रधान ४.हद्दपार ६.जिन्नस ९.रटाळ १०.आले ११.जीवन १३.हजरजबाबी १५.धवल १७.साकारणे १८.बळ १९.कर्म २१.मणेर २३.सरसहा २४.कमालकिमान २६.दरदरून २७.मान २८.भागवा ३०.दया ३२.मधमाशी ३५.नवरस ३६.दशानन ३७.शिंतोडा ३८.वखार ३९.कवी ४०.अंक ४१.वाटोळा ४३.डीर ४५.बार ४६.गणेश ४८.नाचा ४९.काव ५०.शुद्ध ५१.रसदार ५४.घोरपड ५६.कोडगा ५७.जारण ५८.कडवट ६०.सव ६१.बघे ६२.चोर ६३.सरल ६५.टकटक ६७.तारकस ६८.साखर ६९.कडक

**उभे उत्तर**

१.पंतोजी २.प्रधान कार्यालय ३.नरमणे ४.हळहळणे ५.पाचर ६.जिलेबी ७.सर्वधर्मसमभाव ८.आकलन १०.आबाळ १२.वसा १४.जबरदस्त १९.कर २०.मकरंद २१.मन २२.रदन २३.सनई २५.मानधन २६अ.सुवास २७.माशी शिंकणे २९.गरम ३१.यादवी ३२.मनधरणी ३३.खडावा ३४.सावळा ३५.नरडीचा घोट घेणे ४०.अंगझाडणे ४२.टोकदार ४४.सवड ४७.शर ४९.कापडचोपड ५०.शुभंकरोती ५२.सजावट ५३.रण ५५.अवसर ५९.टर ६०.सकस ६४.लता ६५.टक ६६.कसा

## "मीनाकुमारी"

फैज अहमद, धुळेकर | यादोंकी बारात

फिल्मी चंदेरी जगात चंद्र काचेचा असतो आणि फुले गगदाची असतात, अश्या मुखवट्याची दुनियात मीना कुमारी एकदम ओरिजनल वाटायची,कारण तिच्या अभिनयचा गाभा संयम होता, स्वाभाविक आणि प्रभावी अभिनय हे तिचे वैशिष्ट्य होते.मोजक्या व कमीत कमी संवादातून व मोजक्या हालचालीतून ती संवाद व कथेचा आशय अचूक व्यक्त करीत होती. अनेकदा संवादाची गरज सुध्दा भासत नव्हती मीनाकुमारीचे मिटलेले ओठ व पाणावलेले डोळे तर बोलत होतेच पण, थरथरणाऱ्या पापण्या पण खूप काही सांगून जात होत्या.एका वाक्यात नजरेने किंवा दबल्या ओटाने प्रेक्षांच्या काळजात ती येऊन बसायची, तिचा परिणीती चित्रपट फक्त तिच्या चालण्यासाठी पहावा.अस वाटेल कि याच भूमिके साठी तिचा जन्म झाला असावा. ती अभिनयात साखरे सारखी विरघळून जायची आणि पूर्ण चित्रपट गोड करून जायची.बैजू बावरा,बंदिश,एक ही रास्ता, चिराग कहां रोशनी कहां, शारदा, दिल अपना प्रीत पराई,फूल और पत्थर,चित्रलेखा,साहिब बिबी और गुलाम,पाकीजा,सारख्या चित्रपटातील भूमिकेशी ती इतकी एकरूप झाली की चित्र पूर्ण झाल्यावर तिला त्यापासून दूर करांव लागलं असेल.कोहिनूर चित्रपटात हातात सोटा घेऊन तिला मारामारी करावी लागली,तरी देखील तिने आपली शान कमी होऊ दिली नाही.तिचे संवाद म्हणजे तिचा आवाज सदोष होता,नूतन,वैजयंती माला,सारखी मधुर नव्हती,तिच्या आवाजाची पट्टी वहिदा रहमान सारखी खालची नव्हती.नर्गिसच्या आवाजातील करारी धार तिच्याकडे नव्हती. मधुबालाचा खट्याळपणा गीताबालीची लय नव्हती,तरी मीनाकुमारी शेवटी मीनाकुमारी होती. अभिनय जिवंत होता.प्रत्येक शब्दात तिच्या हृदयाची कैफियत जाणवत होती.



ऐसी जगह पर बदनसीब नही जाते,यहुदी चित्रपटातील हन्ना, औरतजात के लिये इतना बडा अपमान,इतानी बडी लज्जा,साहिब बिबी मधली छोटिबहू, पाकिजा मधली साहेब जान, तावायफों की कबरें खुली रखीं नही जाती, पाकीजा हा इतिहास आहे या महान अभिनेत्रीच्या कारकीर्दीचा.म्हणजे अभिनयाची परिसीमा होती मीनाकुमारी. ग्लीसिरींचा एक थेंबही न वापरता रडणारी व्याकूळ नायिका पडद्यावर दिसणार नाही.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# तळागाळातील शोषित वर्गाला न्याय देण्यासाठी छावा क्रांतिवीर सेना काम करणार

## सांगली जिल्ह्यात पहिल्या शाखेचे जल्लोषात उद्घाटन

### पदाधिकारी आढावा बैठक, नवनियुक्ती मोठ्या उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**





क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश महासचिव शिवाजीराजे मोरे, प्रदेश संपर्कप्रमुख नितीन शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष सुभाष गायकर, आयटी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव दळवी, जिल्हा सरचिटणीस सागर शेजवळ, प्रदेश संघटक महिला आघाडी अपर्णा माळी, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख महिला आघाडी अश्विनी नरगुंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये काल सांगली जिल्हा आढावा बैठक आणि नवीन पदाधिकारी निवड बैठक संपन्न झाली.

सांगली जिल्ह्यात छावा क्रांतिवीर सेनेचे वादळ निर्माण करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी संकल्प केला असून पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतात संघटनेची पदे आम्ही शोभेसाठी नव्हे तर तळागाळातील शोषित वर्गाला न्याय देण्यासाठी घेतो आहोत. पुढील एक महिन्यात महाराष्ट्रात एक नंबरचे काम सांगली जिल्ह्यात करून दाखवण्याची आम्ही सर्व एकमताने एक दिलाने काम करू व १ जानेवारी रोजी नाशिक येथे होणाऱ्या वर्धापन दिनासाठी हजारो पदाधिकारी नाशिकला येतील असाही शब्द यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांना दिला.

उपस्थित नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी सांगितले की, संघटना हा आपला आत्मा आहे. ज्या पद्धतीने आपण स्वतःच्या शरीराची काळजी घेतो, ज्या पद्धतीने स्वतःला जपतो त्याच पद्धतीने संघटनेला जपणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने महिनाभरात दिवसाला एक पदाधिकारी याप्रमाणे ३० पदाधिकारी जोडले तर सांगली जिल्ह्यामध्ये असे गाव शिल्लक राहणार नाही की तिथे छावा क्रांतिवीर सेनेचे नाव नसेल. तुम्ही सर्व पदाधिकारी ज्या पद्धतीने माझ्यासोबत ताकतीने उभे आहात हीच ताकद येणाऱ्या काळात महाराष्ट्रभर छावा क्रांतिवीर सेनेला यशोशिपरावर पोहोचविण्यासाठी कामी येईल. तुमच्या सगळ्यांचा आत्मविश्वास मला काम करण्यासाठी नवीन ऊर्जा देते येणाऱ्या काळामध्ये छावा क्रांतिवीर सेनेच्या माध्यमातून शेतकरी, सहकार, कामगार, महिला या सर्व घटकांना न्याय देण्यासाठी आपण प्रत्येक विभागात संघटनेच्या माध्यमातून निवेदने, उपवासाने वेळप्रसंगी आक्रमकपणे रास्ता रोको निदर्शने करून या सर्व सामाजिक घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करायचा आहे असे आवाहन करण गायकर यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन सांगली जिल्हा प्रमुख दीपक मुळीक, ग्रामीण जिल्हाप्रमुख संदीप गावडे, पश्चिम महाराष्ट्र चित्रपट आघाडी अध्यक्ष प्रमोद थोरबोले, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष आशिष मुळीक, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष नेहा कुंभार, ग्रामीण महिला जिल्हाध्यक्ष रेखा कापसे आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# कांदा संरक्षणासाठी कृषकचे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान हे कांदा उत्पादकासाठी क्रांतिकारक पाऊल : डॉ.मोहंती

**नाशिक । वार्ताहर**




काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र व काँग्रेसचे कर्नाटकातील मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर निषेधार्ह वक्तव्य केले. सदर वक्तव्याचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शहरातील रेडक्रॉस सिग्नल येथे तिरडी आंदोलन करण्यात आले.

खर्गे यांनी आपल्या वक्तव्यात सावरकरांची प्रतिमा कर्नाटक विधानसभेतून काढून टाकण्यात यावी अशी मागणी केली. याविरोधात देशभरातील राष्ट्रप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विविध स्तरांवरून या वक्तव्याचा निषेध होत आहे. भाजयुमो, नाशिक तर्फे काल सकाळी रेडक्रॉस सिग्नल येथे तिरडी आंदोलन करत खर्गेंचा निषेध नोंदवण्यात आला. यावेळी अध्यक्ष सागर शेलार म्हणाले, काँग्रेसचा सावरकर द्वेष जगजाहीर आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या सूर्यावर आरोप करण्याची लायकी नाही. सावरकरांवर सतत गरळ ओकणाऱ्या काँग्रेससोबत असलेल्या उद्धव ठाकरे व संजय राऊत यांनी आता स्वतःची भूमिका स्पष्ट करावी. सोयीचे हिंदुत्व आणि सावरकरद्वेष्ट्या काँग्रेस बाबत दुटप्पी भूमिका हाच ठाकरेंच्या सत्तालोभाचा खरा चेहरा आहे असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, सरचिटणीस नाना शिलेदार, वसंत उशीर, शहर उपाध्यक्ष मीनल भोसले, प्रदेश महामंत्री योगेश मैंद, प्रदेश उपाध्यक्ष अनिकेत पाटील, क्रीडा संयोजक विजय बनसोडे, महिला मोर्चाच्या सोनाली ठाकरे, सरचिटणीस शिवा जाधव, डॉ. वैभव महाले, प्रशांत वाघ, प्रवीण भाटे, अमोल पाटील, पवन उगले, विनोद येवले, सचिन मोरे, संदीप शिरोळे, कमलेश पिंगळे, सौरभ निमसे, तुषार नाटकर, उमेश शिंदे, गौरव घोलप, गौरव केदारे, सचिन शेजवळ, अंकुश जोशी, शरद आढाव, विशाल पगार, निलेश पवार, आकाश मोरे, विक्रांत गांगुर्डे, विशाल पगार, प्रतीक शुक्ल, मुफद्दल पेंटर, भाविक तोरवने, अनिकेत सोनवणे, ऋषिकेश शिरसाठ, अमित चव्हाण, विजय गायखे, रविंद्र गांगुर्डे, पार्थ मानकर, हर्षल आहेर, राज चव्हाण, ऋषिकेश फुले, भूषण शाहाने, सुरज चव्हाण, शुभम जाधव, वैभव दराडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व सावरकरप्रेमी उपस्थित होते.

# केंद्र शासनाने लागु केलेल्या कांदा निर्यात बंदीचा पुर्नःविचार करावा : सुवर्णा जगताप

**लासलगाव । वार्ताहर**



केंद्र शासनाने दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत कांदा निर्यात बंदी केल्याबाबत अधिसुचना प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे दि. ०८ डिसेंबर, २०२३ रोजी नाशिक जिल्ह्यातील बहुतांश बाजार समित्यांमध्ये केंद्र शासनाच्या सदर निर्णयामुळे कांदा बाजारभावात घसरण झाल्याने शेतकरी बांधवांनी अनेक ठिकाणी कांदा लिलावाचे कामकाज बंद पाडले असुन रस्ता रोको आंदोलन सुरू केलेले आहे.याबाबत लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा जगताप यांनी वाणिज्य मंत्री पियुष गोयल,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्य मंत्री डॉ भारती पवार यांना पत्र लिहून केंद्र शासनाने लागु केलेल्या कांदा निर्यात बंदीचा पुर्नःविचार होणेबाबत विनंती केलेली आहे.

शुक्रवार, दि. ०८/१२/२०२३ रोजी लासलगांव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारावर ४२२ वाहनांमधुन लाल (खरीप) कांदा तर ६१ वाहनांमधुन उन्हाळ (रब्बी) कांदा विक्रीस आला होता त्यापैकी लाल (खरीप) कांदा साठविण्यायोग्य नसल्याने शेतक-यांना सदर कांदा काढणीनंतर लगेच विक्री करण्याशिवाय कोणताही पर्याय नसतो.त्यामुळे दरवर्षी बाजार आवारांवर लाल (खरीप) कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होते. सद्यस्थितीत लासलगांव बाजार समितीत कांद्याची दररोज ०९ ते १० हजार क्विंटलची आवक होत असुन लवकरच बाजार आवारावर लेट खरीप (रांगडा) कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू होणार असल्याने डिसेंबर अखेर आवकेत अजुन वाढ होण्याची शक्यता आहे. परंतु केंद्र शासनाने कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतल्याने शेतकरी बांधवांमध्ये केंद्र शासनाच्या ध्येय धोरणांबाबत असंतोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी लासलगाव मुख्य बाजार आवारावर दैनंदीन कांदा लिलावाचे कामकाज सुरू होऊ दिले नाही. सदर निर्णयामुळे शेतकरी बांधवांना सध्या कांदा या शेतीमालास जो काही दर मिळत होता. त्यावर मोठ्या प्रमाणावर परीणाम होऊन शेतकरी बांधवांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

# हभप गोरख महाराज थेटे यांची तालुका सहअध्यक्ष पदी निवड

**नाशिक । प्रतिनिधी**

दुगांव ता.नाशिक येथील वारकरी संप्रदायाचे उपासक व निष्ठावंत वारकरी वास्तूविशारद हभपश्री गोरख महाराज थेटे यांची जिल्हाध्यक्ष हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी नाशिक तालुका सह अध्यक्षपदी नुकतीच



नियुक्ती केली आहे.तसे नियुक्ती पत्र हभपश्री आहेर महाराज यांनी दिले आहे. त्यांचे निवडीचे दुगांव समस्त गांवकरी, भजनी मंडळ वारकरी मंडळ भजनी मंडळ, गुरु दत्त भजनी मंडळ, भिवाजी गणपत थेटे, उत्तम महाराज जाधव, माधव बापुजी शिंदे, रामदास रामचंद्र नवले,सुनिल शिवराम थेटे, सोमनाथ दत्तात्रय शिंदे, हरिभाऊ तुळशीराम थेटे, मच्छिंद्रनाथ बाबुराव थेटे, सुनिल नारायण थेटे, राजेंद्र शिवाजी थेटे, हिरामण पोपट थेटे, पुंजाराम निवृत्ती थेटे, शिवदास नामदेव वाघ,पोपट सिताराम थेटे, राजेंद्र संपत चव्हाण, सुरेश गायकवाड, मयुर संतोष नळवाडे, आकाश हरिभाऊ थेटे, तसेच दुगांव पंचक्रोशीतील सर्व वारकरी, भाविक, भजनी मंडळे यांनी अभिनंदन व स्वागत केले आहे.

# भाजपा नाशिक महानगर अनुसुचित जाती मोर्चाची कार्यकारिणी घोषित













**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपा नाशिक महानगर अनुसुचित जाती मोर्चा कार्यकारणी अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष राकेश दोंदे यांनी घोषित केली. भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली. सदर कार्यकारणी प्रदेश भाजपने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केली असल्याचे अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष राकेश दोंदे यांनी पत्रकात म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे, ना.गिरीष महाजन, भाजपा प्रदेश महामंत्री विजय चौधरी व विक्रांत पाटील, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दिलीप कांबळे, आ.राहुल ढिकले, आ.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदिप पेशकार, गोविंद बोरसे, अनुसुचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष गणेश कांबळे, बाळासाहेब सानप, विजय साने, सतिश कुलकर्णी, भाजपा नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या विशेष मार्गदर्शनाने आणि भाजपा नाशिक शहर सरचिटणीस सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, ॲड.श्याम बडोदे, हिमगौरी आडके, रोहीणी नायडू वानखेडे, महानगर मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे नाशिक महानगर अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष - राकेश दोंदे, उपाध्यक्ष - डॉ. पुनम सोनवणे, आशा कांबळे, सुरेखा केदारे, प्रविण नन्नावरे, लक्ष्मण पगारे, दशरथ गांगुर्डे, अनिल मोरे, मदन निकम, संतोष गायकवाड, सुनिता वाव्हळ, देविदास शिरसाट, आंबादास आहिरे, मोनु वाघमारे. सरचिटणीस - भगवान दोंदे, कुंदन खरे, गजानन रणबावळे, राजीव मोरे, कविता तेजाळे, चिटणीस - राजश्री शिंदे, वैशाली त्र्यंबके, उषा ताठे, अविनाश गांगुर्डे, रविंद्र जामकर, ज्ञानेश्वर साळवे, वामन (नाना) खंडाळे, सुधाकर वाटोरे, गोपाळ रणशिंगे, नाना नेटावटे, मनोज साळवे, सुजित मोरे यांचा समावेश आहे.

# मुकेश आर. पटेल स्कूल मध्ये इंग्लिश स्पेल बी स्पर्धा संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई, संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूल मध्ये इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांची स्पेल बी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतून शब्द भांडार, शब्दांच्या उत्पत्तीचे ज्ञान वाढणे, अक्षरे व ध्वनी, संघ बांधणी आणि आत्मविश्र्वास वाढण्यास मदत होते या दृष्टीने शाळेत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. सरस्वती वंदना करुन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत चित्र ओळखून शब्दाचे स्पेलिंग सांगणे, शब्दातील गाळलेले अक्षर ओळखणे, कोडे ओळखणे, योग्य शब्द ओळखणे, आवाज ओळखणे व रॅपिड फायर अशा एकूण सात फेऱ्या घेण्यात आल्या. सर्वोच्च गुणसंख्येसह चॅरिटी हाऊसने प्रथम क्रमांक मिळवला तर पीस हाऊसने द्वितीय व जॉय हाऊसने तृतीय क्रमांक मिळवला.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुकसान भरपाई द्यावी

### मुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांना आम आदमी पार्टीचे पत्र

**नाशिक । प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी आपच्या पदाधिकाऱ्यांनी संवाद साधत त्यांना दिलासा प्रयत्न केला आहे. या पाहणी दरम्यान जवळपास सर्वच पिकांचे खूप मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. काही शेतकरी तर आमच्या जवळ ढसाढसा रडलेत, कारण त्यांची पूर्ण वर्षाची कमाई अवकाळी पावसामुळे पाण्यात गेली आहे. काहींनी सांगितले की, बँकेचे कर्ज आता कसे फेडू? आम्हाला आता आत्महत्या करण्यापलीकडे काहीही पर्याय नाही अशा प्रकारचा विदारक प्रसंग शेतकऱ्यांनी आम आदमी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांकडे मांडला आहे. या पार्श्र्वभूमीवर पक्षातर्फे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांकडे आम आदमी पार्टीने पत्र पाठवून केली आहे.

या पाहणी दौऱ्यात काही शेतकऱ्यांनी सांगितले की, आमच्या मुलीचे लग्न कसे करू, काहींनी सांगितले की आमच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी कसे पाठवू असे बोलून दाखविले आहे. शेतकऱ्यांची विधारक परिस्थिती पाहता त्यांना अतिशय तातडीने मदत देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे पत्र आम आदमी पक्षातर्फे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री तसेच कृषी मंत्र्यांकडे एका पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे.

या पत्रात पक्षाचे नविंदर अहलुवालिया यांनी म्हटले आहे की, एकनाथ शिंदे आपण राज्याचे प्रमुख आहात या नात्याने आपल्या राज्यातील ह्या नैसर्गिक अवकृपेमुळे ओढवलेल्या परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांचे परिवार उध्वस्त झाले आहेत. त्यांना सावरण्याची जबाबदारी आपली आणि कृषिमंत्री धंनजय मुंडे यांची आहे. त्यामुळें आपण जबाबदारी ओळखून तात्काळ मदत पोहोचवावी. यामुळे जेणेकरून शेतकरी पुढील पिकांच्या पेरणीची तयारी करतील.

तर चंदन पवार यांनी म्हटले आहे की, एकनाथ शिंदे आपण स्वतः शेतकरी आहात त्यामुळे शेतकऱ्यांचे दुःख आपल्याला चांगल्या प्रकारे समजू शकते. हाच धागा पकडून शेतकऱ्यांची परिस्थितीला पुन्हा रुळावर आणण्यासाठी आम आदमी पार्टी आपल्याकडे महत्वाच्या मागण्या करीत आहे कृपया आपण त्या पूर्ण कराल याची खात्री आहे. अजूनही शेतकरी मदतीपासून वंचित आहेत याकडे आपण लक्ष केंद्रित कराल अशी विनंती दिलेल्या पत्रात करण्यात आली आहे. यासंबंधीचे मागणी पत्र नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्यामार्फत देण्यात आले आहे. यावेळी राज्य संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, राज्य मिडिया प्रमुख चंदन पवार, नासिकचे पदाधिकारी गिरीश उगले पाटील, प्रविण पगारे, एकनाथ सावळे आदी उपस्थित होते.

# अभ्यासाला कला-कौशल्याची जोड उपयुक्त - पाठक

**नाशिक । प्रतिनिधी**






विद्यार्थ्यांनी दैनंदिन अभ्यासाला कला - कौशल्याची जोड द्यावी. व्यक्तिमत्व विकासाला ते उपयुक्त ठरते. रोटरी क्लब सदस्यांनी त्यासाठी पुढाकार घेऊन निरागस बालकांवर कलेचे संस्कार केले. त्याचा सराव पुढील काळात मुले जरूर करतील असे प्रतिपादन आधाराश्रमाचे कार्यवाह हेमंत पाठक यांनी केले.

दिवाळीच्या पूर्वी रोटरी क्लबचे सदस्य आधारआश्रमातील मुला, मुलींना चित्रकला, हस्तकला, गाणी, नृत्य आदी कलाकौशल्ये शिकवायला येत होते. सुमारे तीन महिने दररोज दोन तास हा उपक्रम चालला. काल त्याच्या समारोपाचा कार्यक्रम घारपुरे घाटावरील आधाराश्रमाच्या सभागृहात आयोजीत करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबच्या या उपक्रमाच्या प्रमुख उर्मी दिनानी, उर्मिला देवधर व्यासपीठावर उपस्थित होत्या. तीन महिन्यांच्या कालावधीत चित्रकला व हस्तकला अनुजा चौघुले वहेतल गाला यांनी शिकवली. सोनाली व रचना चिंधडे यांनी नृत्य व गायनाचे सराव करून घेतले.

राजेश्वरी बालाजीवाले व तेजल शाह यांनी कथाकथन, नाट्याची गोडी लावली. दमयंती बराडिया व तेजल शाह यांनी गायनाचे प्रकार समजावून दिले. गौरी कुलकर्णी व रुपाली शाह यांनी वैयक्तिक स्वच्छता कशी राखवी याचे धडे दिले तर उर्मी दिनानी व गौरव संगमनेरकर यांनी श्लोकपठणाचे संस्कार केले.

कालच्या कार्यक्रमात मुला मुलींनी काही गाणी, नाट्य सादर केली. या स्नेहमय कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन समन्वयक राहुल जाधव यांनी केले. आधाराश्रमाचे अध्यक्ष विजय दातार यांच्या हस्ते सर्व मान्यवरांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तर कीर्ती थिटे यांनी आभार मानले.

# गावरान बकरीने दिले चक्क पाच पिल्ले

**लासलगाव । प्रतिनिधी**



निसर्ग अनेक चमत्कारिक गोष्टीनी भरला आहे,त्यात अनेक असामान्य गोष्टी बघायला मिळतात.शिरवाडे वाकद ता.निफाड येथे अशीच एक चमत्कारिक गोष्ट बघायला मिळाली ती म्हणजे गावरान शेळीने चक्क पाच पिल्लांना जन्म दिला आहे.

कधी अत्यल्प पर्जन्यमान तर कधी अतिवृष्टी मुळे दिवसेंदिवस शेतीच्या उत्पन्नात घट होत असल्याने पर्यायी जोडधंदा म्हणून पाळलेल्या एका बकरीने चक्क पाच पिल्ले दिल्याची घटना शिरवाडे वाकद येथे घडल्याने या शेतकऱ्याच्या घरी आनंदाची दिवाळी उजळल्याचे चित्र आहे.येथील शेती व्यावसायिक किरण आवारे हे बऱ्याच दिवसांपासून वडिलोपार्जित शेती करतात.त्यांना वडगाव पंगू ता.चांदवड येथील नातेवाईकांनी एक बकरी भेट दिली.या बकरीच्या विस्ताराने पाच वर्षात तब्बल एक लाखाच्या वर आर्थिक कमाई दिली.निसर्गाच्या अवकृपेमुळे दिवसेंदिवस शेतीचे उत्पन्न घटत असल्याने शेतीला जोडधंदा म्हणून शेळी पालन व्यवसाय कुटुंबाला चांगलाच आर्थिक आधार झाला आहे. त्यातच गावरान बकरीला 'निसर्गाची किमया न्यारी' झाली अन् या बकरीने दुसऱ्या वेतात चक्क पाच पिल्ले दिल्याने कुटुंबियाच्या घरी आनंदाचे वातावरण पसरले आहे.ही सर्व पिल्ले सुस्थितीत असून या बकरीला पहिल्या वेतात तीन पिल्ले झाली होती. शेतकऱ्यांना कमी चाऱ्यात व कमी जागेत शेळी पालन व्यवसाय करणे फायदेशीर आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीपूरक जोडधंदा म्हणून शेळीपालन व्यवसायाकडे वळणे गरजेचे आहे. म्हणून शेळी पालकांनी अशा बकरीचे मोठ्या प्रमाणात पालन करावे असे आवारे यांनी सांगितले.

## न्यूज कॉलम

### चेन स्नॅचिंग, मोबाईल हिसकावला

**नाशिक ।** शहरात घडलेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत तसेच युवकाच्या हातातील मोबाईल हिसकावून नेल्याचा प्रकार उघडकीस आला. शुक्रवारी (ता. ८) सायंकाळी सातच्या सुमारास सीमा मराठे (रा. मखमलाबाद रोड) त्यांच्या घराकडे चालल्या असताना दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळ्यातील पोत ओरबडली.

### भूलथापा देत दागिने, मोबाईल चोरले

**नाशिक ।** मोफत धान्याचे आमिष दाखवत व गप्पांमध्ये भुलवत चोरट्यांनी दागिने व मोबाईल असा ३० हजार रुपयांचा ऐवज लांबवत वृद्ध महिलेला गंडविले. सराफ बाजार परिसरात घडली. या प्रकरणी हुसना बी. इसाक खान (रा. भद्रकाली) यांनी सरकारवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# वंचित घटकांना मिळतोय विविध योजनांचा लाभ

### नरडाणा येथे विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त कार्यक्रम संपन्न





**धुळे । प्रतिनिधी**

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून सर्वसामान्य, वंचित, महिला, युवक, शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ.सुभाष भामरे यांनी नरडाणा येथे केले.

भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थींपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. या यात्रेचा शुभारंभ आज नरडाणा येथे खासदार डॉ. भामरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास आमदार जयकुमार रावल, जिल्हा परिषदेचे महिला व बालविकास सभापती संजीवनी सिसोदे, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती भाऊसाहेब पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक बाळासाहेब बोटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कुरबान तडवी, प्रकल्प अधिकारी प्रमादे पाटील, गट विकास अधिकारी प्रदीप पवार, सरपंच मनीषा सिसोदे, उपसरपंच जागृती सिसोदे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समिती सदस्य,सभापती, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार डॉ.भामरे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ९ वर्ष पूर्ण झाले असून या कालावधीत समाजातील सर्व घटकांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने ७५ प्रकारच्या योजना सुरु केल्या आहेत. या विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून २०४७ पर्यंत भारताला विकसित भारत करण्याचा संकल्प आहे. शेवटच्या घटकातील नागरिक, महिला, शेतकरी, युवा यांचा सर्वांगिण विकास झाला तरच विकसित भारत होण्याचा संकल्प पुर्ण होणार आहे. केंद्र सरकारने कोरोनाकाळात १४० कोटी जनतेला कोविड प्रतिबंधक मोफत लस देण्यात आली. त्याचप्रमाणे भारतातील ८० कोटी गरीब जनतेला गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून मोफत अन्नधान्य पुढील पाच वर्ष पर्यंत देण्यात येत आहे. गरीबासाठी केंद्र सरकारने अनेक योजना राबविल्या आहे. या विविध योजनांचा लाभ गरीब, वंचित, दुर्बल घटकापर्यंत पोहचावा यासाठी या विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आयुष्मान भारत योजने सारखी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेच्या माध्यमातून ५० कोटी जनतेला आयुष्मान कार्ड देण्याचे उद्दिष्ट आहे. या कार्डच्या माध्यमातून ५ लाखापर्यंत विविध आजारावर मोफत उपचार मिळणार आहे. धुळे जिल्ह्यात जवळपास १ लाख लाभार्थ्यांनी अद्याप पर्यंत आयुष्मान भारत कार्ड काढलेले नाही, त्यामुळे या यात्रेच्या माध्यमातून ज्यांना हे कार्ड मिळाले नाही त्यांची नोंदणी करुन ते तयार करुन घ्यावे. आज सकाळपासून जवळजवळ २३० लाभार्थ्यांना हे कार्ड देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# वरवाडे येथे आयुष्यमान भारत योजना मोहिम उत्साहात संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

वरवाडे येथे भूपेशभाई फ्रेंड सर्कल तर्फे आयुष्मान भारत योजना मोहिम उत्साहात संपन्न झाली.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना म्हणजे आयुष्मान भारत यादीमध्ये नाव असणे आवश्यक असल्याने शासकीय व खाजगी रुग्णालयात मोफत उपचारासाठी आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्षा सौ.जयश्रीबेन पटेल, माजी उपनगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपा शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल, माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के.डी.पाटील, माजी नगरसेविका सौ.चंद्रकला संतोष माळी, माजी नगरसेवक दिपक महादु माळी यांच्या नेतृत्वाखाली वरवाडे वार्ड नं. १३ मध्ये संपूर्ण परिसरातील जनतेसाठी ७ व ८ डिसेंबर या दोन दिवसात भूपेशभाई फ्रेंड सर्कलने संत सावता माळी मंदीरात व श्री.म्हाळसादेवी मंदीरात ४०५ आयुष्मान कार्ड के.वाय.सी. करण्यात आले. शिरपूर आमदार कार्यालयातीलविकास योजना आपल्या दारी अभियान स्वयंसेवक, भूपेशभाई फ्रेंड सर्कलचे स्वयंसेवक अनिल सोनवणे, पवन पावरा, आकाश बागले, आशा वर्कर वैशाली बुवा यांनी प्रयत्न केले.

# रोटरी क्लब धुळे तर्फे व्होकेशनल अॅवार्ड्सचे वितरण

**धुळे । प्रतिनिधी**




अनेकविध सामाजिक उपक्रमांसाठी सातत्याने अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड तर्फे चार दिवसांच्या व्यावसायिक प्रदर्शनाचे अर्थात धुळे फेस्टिव्हल चे आयोजन मालेगाव रोडवरील गिंदोडिया कंपाऊंड येथे गुरुवार पासून करण्यात आले असून रविवारी रात्री या लोकप्रिय प्रदर्शनाचा समारोप होत आहे.

गत तीन चार दिवसात असंख्य धुळे करांनी धुळे फेस्टिव्हल ला भेट देऊन रोटरी क्लबचा हा लोकप्रिय प्रकल्प आपल्या उपस्थितीने यशस्वी केला आहे. रोटरी क्लबचे प्रांतपाल, पीडीजी, एजी आदी मान्यवर पदाधिकारी यांनी धुळे फेस्टिव्हल ला भेट दिली आहे. काल शनिवारी सायंकाळी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात रोटरी क्लब च्या सामाजिक उत्तरदायित्वा अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमात कार्यरत असलेल्या समाजसेवकांची व्होकेशनल अॅवार्ड्स देऊन गौरविण्यात आले. धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयातील आरोग्य सहाय्यक व जवाहर सूतगिरणी चे जनसंपर्क अधिकारी गोकुळसिंग राजपूत, जिल्हा शासकीय रुग्णालयातील शवविच्छेदन कक्षातील सहाय्यक संदिप रणजित गोयर, शिरुड ता जि धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते व रुग्ण सहायक चित्तरंजन विजय कुलकर्णी, मातोश्री वृध्दाश्रम येथील व्यवस्थापक धिरज शिवा धनगर, जिल्हा रुग्णालयातील परिचारिका सौ प्रतीभा घोडके , सामाजिक कार्यकर्ते अन्सारी रईस अहमद कादीर (रईस हिंदुस्थानी ) यांना सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल व्होकेशनल अॅवार्ड्स देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक मा श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, कमर शेख अजित राजपूत यांनी सूत्रसंचालन केले व सचिव सचिन बोरसे यांनी आभार मानले.

# विश्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे ३१३ रुग्णांची तपासणी

**नाशिक ।** विश्र्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे बाळदे गावात ३१३ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येऊन औषधी वाटप करण्यात आले. बाळदे गावात १० डिसेंबर रोजी ३१३ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येऊन डॉक्टरांच्या सल्लूयानुसार मोफत औषधी देण्यात आली. या वेळी सरपंच सौ. मंदाबाई गरबड भिल, उपसरपंच निंबा तोताराम पाटील, ग्रामसेवक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामी डॉ. निनाद हर्षद शाह (एम. डी.), डॉ. सुनील सी. पावरा (एम.बी.बी.एस.), डॉ. विजेंद्र एल. पाटील (एम.एस.) यांनी आरोग्य निदान केले व फार्मासिस्ट सरीता जमादार, अश्र्विन पाटील दिव्यांग खैरनार यांनी औषध वितरण केले. यानंतर १७ डिसेंबर २०२३ रोजी हाडाखेड, पिंप्राड पाडा या गावात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे प्रबंधक कमिटीने कळविले आहे.

# धुळे जिल्हा परिषदेत घेण्यात आलं रक्तदान शिबीर

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सरकारी रुग्णालय तसेच खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी रक्तसाठा असणे महत्वाचे आहे. रक्त उपलब्ध होण्यापासून रुग्ण वंचित राहता काम नये.


या जाणिवेतून हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांनी शासकीय विभागाला रक्तदान शिबीर घेण्याचे सूचित केले होते. त्यानुसार धुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी बैठक घेऊन शासकीय यंत्रणांसह खासगी स्वयंसेवी संस्थांना रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले होते. त्यास तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत धुळे जिल्हा परिषदेचे पदाधिकारी तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संघटनेतर्फे रक्तदार शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. हे रक्तदान शिबीर धुळे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शुक्रवारी पार पडलं. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने व उत्स्फूर्तपणे रक्तदान करून अधिष्ठाता व जिल्हाधिकारींच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला. सकाळी ९ वाजता सुरु झालेल्या या रक्तदान शिबिरात दुपारी दोन वाजेपर्यंत अडीचशे रक्तदानाच्या पिशव्या संकलित झाल्या होत्या. सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबीर सुरु होतं.




# बोरकुंड- रतनपुरा गटातील ग्रामीण रस्त्यांसाठी साडेतेरा कोटींचा निधी मंजूर

### आ.मंजुळा गावित व बाळासाहेब भदाणे यांच्या पाठपुराव्याला यश





**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील बहुतांश रस्त्यांची कामे ही, निधीअभावी वर्षानुवर्ष रखडली आहे. ग्रामीण भागाच्या धमन्या समजल्या जाणार्या या रस्त्यांच्या कामांसाठी बाळासाहेब भदाणे यांनी शासनस्तरावर भक्कम पाठपुरावा चालविला होता. आ.मंजुळाताई गावित यांच्या माध्यमातून केलेल्या या पाठपुराव्याला यश आले असुन, बोरकुंड-रतनपुरा गटासाठी तब्बल साडेतेरा कोटींची कामे मंजूर झाली आहेत. या दोन्ही गटांतील रस्ते यामुळे चकाचक होणार असल्याने ग्रामीण जनतेतुन समाधान व्यक्त केले जात आहे.

ग्रामीण भागातील, जिल्हा परिषद अंतर्गत असलेले रस्ते वर्षानुवर्ष काम न झाल्याने दुरावस्थेत आहेत. निधीअभावी या रस्त्यांची कामे हाती घेतली जात नाही. परिणामी हे रस्ते वाहतुकीस अयोग्य झाली असुन, यामुळे ग्रामीण भागातील जनतेला मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. यात बोरकुंड ते तरवाडे रस्ता ग्रा. मा.१२३ कि.मी. ४/०० ते ६/०० रस्ता सुधारणा करणेसाठी अडीच कोटी रुपये, जुनवणे ते हेन्दून रस्ता ग्रा.मा. १२६ कि.मी. २/०० ते ४/०० रस्ता सुधारणा करणेसाठी २ कोटी रुपये, सिताणे ते पिंजारपाडे ग्रामा-७७ १/०० ते ३/०० रस्ता सुधारणा करणेसाठी १ कोटी रुपये, धाडरे - हयादळ रस्ता ग्रामा १४२ किमी १/०० ते ३/०० रस्ता सुधारणा करणेसाठी दीड कोटी रुपये, नाणे ते होरपाडे रस्ता ग्रामा १८८ किमी १/०० ते ४/०० रस्ता सुधारणा करणेसाठी दीड कोटी रुपये, बोरकुंड - रतनपुरा ते रवाजे शिवार रस्ता ग्रामा ८६ रस्ता सुधारणा करणेसाठी ३ कोटी रुपये व रामा २११ ते नाणे रस्ता प्रा. मा. १२२ किमी १/०० ते ४/०० रस्ता सुधारणा करणेसाठी २ कोटी रुपये, असे एकुण ७ रस्त्यांसाठी साडेतेरा कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. बोरकुंड- रतनपुरा जिल्हा परिषद गटात आ.मंजुळाताई गावित यांच्या माध्यमातून व बाळासाहेब भदाणे यांच्या पाठपुराव्याने, एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मंजूर मिळाल्याने दोन्ही गटांच्या रस्ते विकासाचा अनुशेष भरून निघणार आहे. जिल्हा परिषद सदस्य शालिनीताई भदाणे, अनिता प्रभाकर भदाणे, पंचायत समिती उपसभापती देवेंद्र माळी यांसह परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहेत.

# लिलाव बंदमुळे कोट्यवधींची उलाढाल ठप्प

**नाशिक ।** कांद्याची निर्यातबंदी केल्यानंतर सलग दुस-या दिवशी शनिवारी (ता.९) कांदा उत्पादक शेतक-यांची संतापाची लाट कायम होती. संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शनिवारी (ता.९) नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको करून आंदोलन केले. केंद्र सरकारने त्वरित कांदा निर्यात बंदी मागे घ्यावी अन्यथा नाशिक जिल्ह्यातील एकही किलो कांदा बाहेर जाऊ देणार नाही, असा इशारा शेतक-यांनी दिला. दरम्यान जिल्ह्यातील विंचूर वगळता सर्व कांदा लिलाव बंद होते. त्यामुळे कोट्यवधींची उलाढाल ठप्प होती.

# कांदा निर्यात बंदीविरोधात शेतकरी आक्रमक; येवल्यामध्ये रास्ता रोको

**येवला । प्रतिनिधी**



केंद्र सरकारने नुकतीच निर्यात बंदी जाहीर करण्यात आली असून मनमाड नगर महामार्गावर शेतकरी पदाधिकारी यांनी रास्ता रोको केला असून बाजार समिती समोर शेतकऱ्यांनी आंदोलन केले. केंद्र सरकारने कांद्यावर अचानकपणे शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर रोजी निर्यात बंदी लादल्याने कांद्याचे भाव पडले आहे. आधीच अवकाळी व गारपिटीमुळे लाल कांद्याचे नुकसान झाले आहे, त्यातच शेतकऱ्यांकडे कांदा शिल्लक नाही नसून त्या कांद्यात थोडाफार भाव मिळत असल्याने केंद्र सरकारने शहरी लोकांचा विचार करत तातडीने निर्यात बंदी लादली. मात्र यामुळे चार हजार रुपये विकणारा कांदा अचानक २००० पेक्षाही खाली विकायला सुरुवात झाली त्यात कृषी उत्पन्न बाजार समिती देखील आता लिलाव बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचा संताप झाल्याचे पहायला मिळत आहे. शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असल्याने राज्यशासनाने तातडीने पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे. यावेळी महामार्ग जाम करण्यात आला व केंद्र सरकार व राज्य सरकार विरोधात घोषणा देण्यात आल्या. याबाबत विधानसभेतही पडसाद उमटले असून शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असून राज्य सरकारने केंद्र सरकारकडे तातडीने निर्यात बंदी उठवण्याची मागणी करावी. सध्या शेतकरी संघटना व शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत.

# पटेल कन्या विद्यालयात विज्ञान प्रदर्शन स्पर्धा संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



येथील एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च विद्यालयातील अटल टिंकरिंग लॅब मध्ये ९ डिसेंबर २०२३ रोजी शालेय स्तर विज्ञान प्रदर्शन स्पर्धा संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सीईओ डॉ.उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

स्पर्धेचे नियोजन प्राचार्य आर.बी.पाटील व पर्यवेक्षक जे.पी.पाटील यांनी केले. स्पर्धेत दोन गट करण्यात आले होते. इयत्ता नववी ते बारावी मोठा गट व इयत्ता सहावी ते आठवी लहान गट यात मोठ्या गटात एकूण ६४ विद्यार्थिनी तर लहान गटात एकूण ४८ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

# पटेल मराठी प्राथमिक शाळेत मम्मीजी क्रीडा महोत्सव साजरा

**शिरपूर । प्रतिनिधी**

शहरातील सुभाष कॉलनी येथील आर.सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत ५ डिसेंबर रोजी पूर्व प्राथमिक विभागासाठी मम्मीजी क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तद्नंतर मम्मीजी व सरस्वती यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

सदर क्रीडा महोत्सवात इयत्ता नर्सरी व बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या शर्यतींचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी माकड, ससा, फुलपाखरू, हत्ती, कांगारू हनुमान इ. वेगवेगळ्या वेशभूषा धारण केल्या होत्या. आभार महेंद्र माळी यांनी मानले.

# देवरे अभियांत्रिकीत मशिन लर्निंग विषयावर कार्यशाळेचे आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**



श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभागातर्फे अंतिम वर्ष तंत्रशास्त्र विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स व ऑटोमेशन क्लब तर्फे मशिन लर्निंग अँड डाटा ॲनॅलिटिक्स या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळेचे काल महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते.

वेल्लोर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी वेल्लोर तामिळनाडू येथील डॉ हेमप्रसाद पाटील या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले याप्रसंगी ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभाग प्रमुख प्रा डॉ पी एस पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून व दिपप्रज्वलनाने कार्यशाळेचा औपचारिक शुभारंभ झाला. कार्यशाळेच्या समन्वयक प्रा सौ दिपाली भामरे, प्रा सौ पल्लवी साळुंके यांनी कार्यशाळेचे उत्तम संयोजन केले, त्यांना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल बोरसे व शिवम गायकवाड यांनी सहाय्य केले. मार्गदर्शक प्रा डॉ हेमप्रसाद पाटील यांनी विद्यार्थ्यांना कार्यशाळेत मार्गदर्शन करताना पायथॉन प्रोग्रॅमिंग, नम्पी, स्कीपी, मशीन लर्निंग अलगोरिदम परफॉर्मन्स मॅट्रिक्स, ॲप्लीकेशन ऑफ मशीन लर्निंग इन डाटा ॲनॅलिटिक्स या विषयांवर तीन सत्रात सविस्तर मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख प्रा डॉ पी एस पाटील यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले, प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यशाळेतून विशेष तांत्रिक कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले व सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रा सौ दिपाली भामरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळा सर्व विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क होती व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. ईलेक्ट्रॉनिक्स, ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स्, संगणक विभागातील मिळून शंभरहून अधिक विद्यार्थी विद्यार्थीनी कार्यशाळेत सहभागी झाले होते. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल पाटील व महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादासाहेब सुभाष देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभागाने या कार्यशाळेचे संयोजन केले.

# खर्दे येथे भारत संकल्प यात्रा रथाचे स्वागत

**वरुळ । प्रतिनिधी**



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रा. रथाचे ग्रामपंचायत खर्दे या गावी.शिरपूर तालुक्याचे आमदार काशीराम पावरा. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी . जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील. खर्दे ग्रामपंचायत येथील सरपंच काशीराम ओंकार पटेल

नवनिर्वाचित लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत ब्रिजलाल गुजर माजी सरपंच भरत लोटन गुजर साहेब ग्राम विकास अधिकारी नंदराज बैसाणे साहेब यांच्या उपस्थितीमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला नायब तहसीलदार पेंढारकर गट विकास अधिकारी एस टी सोनवणे .बाल विकास प्रकल्प अधिकारी वैशाली निकम सहाय्यक गट विकास अधिकारी सुवर्णा पवार मॅडम विस्ताराधिकारी पवार. मोरे साहेब शिक्षण विस्ताराधिकारी आव्हाड .प्राथमिक आरोग्य केंद्र खर्दे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश निकम .प्रा आ.केंद्राचे सर्व कर्मचारी हेही उपस्थित होते विकसित भारत संकल्प यात्रेचे स्वरूप व विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या भारत संकल्प यात्रा रथाचे आयोजन करण्यात आले आहे. असे आवाहन आमदार काशीराम पावरा यांनी सर्व आलेल्या ग्रामस्थांना पदाधिकाऱ्यांना संबोधन केले व शासनाच्या योजना या जास्तीत जास्त गरजू लाभार्थी पर्यंत कशा पोहोचवल्या जातील याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
सोमवार दि. ११ डिसेंबर २०२३



# रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावरील नावावरुन नाराजी

## धुळ्यात भाजपच्या महापौर व नगरसेवकांमध्ये वाद












धुळे ।

विकसित धुळ्यात महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या उद्घाटन फलकावर सांगितल्यानुसार नाव घेण्यात आले नाही. फलकावरील नावावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व सत्ताधारी भाजपच्या महापौर व नगरसेवकांमध्ये वाद झाल्याचे बघावयास मिळाले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक कैलास चौधरी यांनी सुचवलेल्या महापालिका रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी फलकावर नाव नसल्याने त्यांनी सत्ताधारी असलेल्या भाजपच्या महापौर प्रतिभा चौधरी यांना जाब विचारला. उद्घाटन फलकावर त्यांचं नाव नसल्यावरून उद्घाटनापूर्वीच उद्घाटनस्थळी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आजी-माजी नगरसेवकांमध्ये व सत्ताधाऱ्यांमध्ये वाद झाल्याचे बघायला मिळाले आहे. कार्यक्रमाचा केला निषेध महापालिकेच्या रुग्णालयाला माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या मातोश्रींचे नाव देण्यात आले असून, या वादामध्ये खासदार सुभाष भामरे यांनी मध्यस्थी करत हा वाद निवळण्याचा प्रयत्न केला आहे. माजी नगरसेवक कैलास चौधरी यांना या कार्यक्रमातून डावलण्यात आल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या कार्यक्रमाचे निमंत्रण देखील त्यांना देण्यात आले नसल्यामुळे या कार्यक्रमाचा निषेध केला आहे. माजी नगरसेवक कैलास चौधरी हे असताना ठराव करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले व सदर काम सुचवले होते,तसा ठराव देखील करण्यात आला होता. परंतु यावेळी सदर उद्घाटन प्रसंगी येथील फलक अनावरण प्रसंगी फलकावर माजी नगरसेवक कैलास चौधरी यांचे नाव नसल्याने कैलास चौधरी यांनी स्वतःच हीच कापण्याचा निर्णय घेतला व सदर बाबतीत निषेध व्यक्त केला.व या उद्घाटन कामास विरोध दर्शवला व नाव नसल्याचा निषेध देखील व्यक्त केला. महापौर,विद्यमान नगरसेवक व कैलास चौधरी यांच्या काही काळ वाद झाला.परंतु सदर धुळे मनपा संचलित असलेल्या या दवाखान्यात स्व.राजमाता श्रीमंत पदमाराजे कदमबांडे रुग्णालय असे नाव देण्यात येत असल्याने माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या आईच्या नाव असल्याने सदर वाद थांबविण्यात आला व सदर फलक हे नव्याने बदलून त्या ठिकाणी कैलास चौधरी यांचे नाव टाकण्यात येईल असे देखील सांगण्यात आले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक

सोमवार दि. ११ डिसेंबर २०२३



# धुळे जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात संपन्न

## सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवराच्या हस्ते पारितोषिक प्रदान


















धुळे। धुळे

युवकांनी आपले आरोग्य सुदृढ, निरोगी ठेवण्यासाठी आहारात ज्वारी, बाजरी, सावा, नागली अशा पौष्टीक तृणधान्याचा वापर करावा. तसेच तृणधान्य वापर वाढीसाठी युवकांनी जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी केले. जिल्हा क्रीडा कार्यालय, धुळे तसेच जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आज चावरा इंग्लिश मेडीयम स्कुल, धुळे येथे जिल्हास्तर युवा महोत्सव आज उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री.तडवी ते बोलत होते. या महोत्सवाला प्रमुख पाहुणे चावरा इंग्लिश मेडीयम स्कुलचे प्राचार्य सी जीन फादर, तालुका क्रीडा अधिकारी, एम.के.पाटील, क्रीडा अधिकारी रेखा पाटील, कृषि महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.जे.एस.सुर्यवंशी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते विलास कर्डक तसेच चावरा इंग्लिश स्कुलचे शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा अधिकारी श्रीमती पाटील म्हणाल्या की, युवकांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरिता दरवर्षी जिल्हास्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन २०२३-२०२४ या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष २०२३ घोषित केले असल्यामुळे राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्र राज्यासाठी तृणधान्य उत्पादन वाढीसाठी विज्ञानाचा वापर व सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्व या दोन संकल्पना दिल्या आहेत. या संकल्पनेवर आधारीत जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

संकलन : दिपक वाघ